मराठी



# अक्षरभारती

इयत्ता दहावी



मराठी अक्षरभारती, इयत्ता दहावी (द्वितीय भाषा)

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# अक्षरभारती

## इयत्ता दहावी

### (द्‌वितीय भाषा)



9K5HTY

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्‌वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्‌वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्‌वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८
दुसरे पुनर्मुद्रण : २०२०

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मुख्य समन्वयक**

श्रीमती प्राची रविंद्र साठे

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ

**मुखपृष्ठ** : फारुख नदाफ

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** :

**मुद्रक** :

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता दहावीचे 'अक्षरभारती' मराठी हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

मित्रांनो! तुम्हांला मराठीतून एकमेकांशी चांगल्या प्रकारे संवाद साधता यायला हवा. आपले विचार, भावना, कल्पना लेखनातून अभिव्यक्त करता यायला हव्यात. यासाठी मराठी भाषा चांगल्या प्रकारे शिकून उत्तम प्रकारे वापरता यायला हवी, हे विचारात घेऊन या पाठ्यपुस्तकातील पाठांची, स्वाध्यायांची योजना केलेली आहे.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला क्षमतांची यादी दिलेली आहे. त्यावरून कोणती भाषिक कौशल्ये आत्मसात करायची आहेत याची तुम्हांला कल्पना येऊ शकेल.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यावर तुमच्या लक्षात येईल, की त्यामध्ये विविध साहित्यप्रकारांचा समावेश केलेला आहे. गद्य पाठांमध्ये कथा, ललित, विनोदी शैलीतील पाठ, विज्ञान विषयावरील पाठ इत्यादी प्रकारच्या पाठांचा समावेश केला आहे. तसेच पद्य पाठांमध्ये प्रार्थना, संतवाणी, देशभक्तीपर गीत, निसर्गवर्णनपर कविता इत्यादी काव्यप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व पाठांमधील आशय आणि भाषा यांमधील वैविध्य तुम्हांला नक्कीच आवडेल.

या पाठ्यपुस्तकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठाखालील स्वाध्यायांचे स्वरूप आणि रचना वैविध्य. हे स्वाध्याय तुम्हांला पाठांचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या हेतूने स्वाध्यायांतील कृतींची रचना जाणीवपूर्वक केली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचे स्वयंअध्ययन यांमधून भाषा शिकताना तुम्हांला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही. पाठांतराचे दडपणही राहणार नाही.

दैनंदिन व्यवहारात आपणाला पावलोपावली मराठी भाषेचा वापर करावा लागतो. त्या दृष्टीने तुमची उत्तम तयारी व्हावी, यासाठी या पाठ्यपुस्तकातील उपयोजित लेखनाचा सराव उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर रोजच्या व्यवहारांमध्ये तुम्हांला तंत्रज्ञानाचाही वापर करायचा आहे. त्यासाठी पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवण्यासाठी संकेतस्थळांची यादीही दिलेली आहे. प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्वारे उपयुक्त दृक्श्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणारे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, असा विश्वास आहे.


**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.


पुणे
दिनांक : १ जानेवारी, २०१८
भारतीय सौर : ११ पौष १९३९

# भाषाविषयक क्षमता : द्‌वितीय भाषा मराठी

**इयत्ता दहावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
| --- | --- |
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्‌वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद यांबाबत स्वत:चे मत निश्चित करता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद, संभाषण ऐकून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. विविध प्रकारच्या साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६. विविध साहित्यप्रकार ऐकून त्याबाबत मत ठरवता येणे. |
| भाषण-संभाषण | १. विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२. विषयानुरूप स्वत:चे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन, आयोजन करून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. भाषण-संभाषण कौशल्यातील बारकावे समजून घेऊन त्याचा योग्य वापर करता येणे.<br>५. प्रसंगानुरूप समोरील व्यक्तीशी संवाद साधून स्वत:चे मत प्रभावीपणे मांडता येणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर इतर साहित्याचे समजपूर्वक प्रकट वाचन करता येणे.<br>२. विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करून त्यांचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळांवरील माहितीचे वाचन करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचना व माहिती समजपूर्वक वाचून त्याबाबत योग्य विचार करता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुद्‌धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचे लेखन करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह, आलंकारिक शब्द, सुभाषिते यांचा लेखनात उपयोग करता येणे.<br>५. सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे तुलनात्मक लेखन करता येणे.<br>७. ऐकलेल्या, अनुभवलेल्या माहितीचे स्वत:च्या शब्दांत लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

**अध्ययन कौशल्य**

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. दिलेल्या विषयाचा सखोल अभ्यास करून स्वमत मांडता येणे.
३. घटना, प्रसंग, कार्यक्रम यांबाबत अभिप्राय मांडता येणे.
४. शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी यांचा लेखनात व भाषण-संभाषणात प्रभावीपणे वापर करता येणे.
५.आंतरजालाचा वापर करून ऑनलाइन व्यवहार करता येणे. तसेच सोशल मीडियाचा योग्य वापर करता येणे.
६. संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा अभ्यासासाठी वापर करता येणे.
७. प्रसारमाध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, त्याबाबत चिकित्सक विचार करता येणे.
८. विविध सामाजिक समस्यांबाबत आपले मत परखडपणे मांडता येणे.

**भाषाभ्यास**

१. इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.
लिंग, वचन, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार, प्रत्यय व उपसर्ग, शब्दांच्या जाती, विरामचिन्हे, सामान्यरूप, अव्ययीभाव व द्वंद्व समास, उपमा व उत्प्रेक्षा अलंकार, शब्दसंपत्ती, लेखनविषयक नियम इत्यादी.
२. रसविचार, वाक्यरूपांतर.

## शिक्षकांसाठी

मराठी अक्षरभारती (द्वितीय भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी होण्यासाठी विविध कृती योजलेल्या आहेत. व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी मनोरंजक व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला जाणार आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी घटकनिहाय विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये विकसित होणार आहेत. इयत्ता दहावीतील उपयोजित लेखन घटकांची मांडणी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचा विचार करून केली आहे, त्यामुळे शिक्षकांनी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचाही आढावा घ्यावा.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठांच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठांतील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

मराठी अक्षरभारती (द्वितीय भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | तू बुद्धी दे (प्रार्थना)<br>– गुरू ठाकूर | १ |
| २. | संतवाणी–<br>(अ) अंकिला मी दास तुझा–संत नामदेव<br>(आ) योगी सर्वकाळ सुखदाता–संत एकनाथ | २ |
| ३. | शाल<br>– रा. ग. जाधव | ७ |
| ४. | उपास<br>– पु. ल. देशपांडे | १० |
| ❖ | मोठे होत असलेल्या मुलांनो...<br>(स्थूलवाचन)<br>– डॉ. अनिल काकोडकर | १५ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ५. | दोन दिवस (कविता)<br>– नारायण सुर्वे | १७ |
| ६. | चुडीवाला<br>– जयश्री रुईकर | १९ |
| ७. | फूटप्रिन्टस<br>– डॉ. प्रदीप आवटे | २३ |
| ८. | ऊर्जाशक्तीचा जागर<br>– डॉ. रघुनाथ माशेलकर | २८ |
| ❖ | जाता अस्ताला<br>(स्थूलवाचन)<br>– गुरुदेव रवींद्रनाथ टागोर | ३१ |


## भाग –३


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ९. | औक्षण (कविता)<br>– इंदिरा संत | ३३ |
| १०. | रंग साहित्याचे | ३६ |
| ११. | जंगल डायरी<br>– अतुल धामनकर | ४२ |
| १२. | रंग मजेचे रंग उदयाचे (कविता)<br>– अंजली कुलकर्णी | ४५ |
| ❖ | जगणं कॅक्टसचं<br>(स्थूलवाचन)<br>– वसंत शिरवाडकर | ४७ |


## भाग –४


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १३. | हिरवंगार झाडासारखं (कविता)<br>– जॉर्ज लोपीस | ५० |
| १४. | बीज पेरले गेले<br>– चंदू बोर्डे | ५२ |
| १५. | खरा नागरिक<br>– सुहास बारटक्के | ५५ |
| १६. | स्वप्न करू साकार (कविता)<br>– किशोर पाठक | ५९ |
| ❖ | व्युत्पत्ती कोश<br>(स्थूलवाचन) | ६१ |
| ❖ | उपयोजित लेखन | ६८ |

# १. तू बुद्धी दे

भाग १

**गुरू ठाकूर** (१९६८) :

प्रसिद्ध कवी, गीतकार, स्तंभलेखक, नाटककार, कथा, पटकथा आणि संवादलेखक. मराठी चित्रपटांसाठी त्यांनी लिहिलेली गीते अतिशय लोकप्रिय आहेत. 'नटरंग', 'अगं बाई अरेच्चा', 'घर दोघांचे', 'टाइमपास', 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' यांसारख्या अनेक प्रसिद्ध मराठी चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले आहे. सर्वोत्कृष्ट गीतकार म्हणून त्यांना सन २००९ साली 'कलागौरव' पुरस्कार व सन २०१० साली 'झी गौरव' पुरस्कार यांनी सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रार्थनेत सन्मार्ग, सन्मती आणि सत्संगती यांचे महत्त्व कवीने अधोरेखित केले आहे. कायम सत्याची कास धरता यावी, संवेदनशीलता जपण्यासाठी ताकद मिळावी, अनाथांचे नाथ होण्यास बळ मिळावे व शाश्वत सौंदर्याचा ध्यास लागावा, या भावना प्रार्थनेतून व्यक्त झाल्या आहेत.

तू बुद्धि दे तू तेज दे नवचेतना विश्वास दे
जे सत्य सुंदर सर्वथा आजन्म त्याचा ध्यास दे

हरवले आभाळ ज्यांचे हो तयांचा सोबती,
सापडेना वाट ज्यांना हो तयांचा सारथी
साधना करिती तुझी जे नित्य तव सहवास दे

जाणावया दुर्बलांचे दुःख आणि वेदना
तेवत्या राहो सदा रंध्रातुनी संवेदना
धमन्यातल्या रुधिरास या खल भेदण्याची आस दे
सामर्थ्य या शब्दांस आणि अर्थ या जगण्यास दे

सन्मार्ग आणि सन्मती लाभो सदा सत्संगती
नीती ना ही भ्रष्ट हो जरी संकटे आली किती
पंखास या बळ दे नवे झेपावण्या आकाश दे



**शब्दार्थ :**

**नवचेतना** – नवचैतन्य. **सर्वथा** – सदैव, सर्व अर्थांनी. **आजन्म** – जन्मभर. **सारथी** – मार्ग, रस्ता, दिशा दाखवणारा. **रंध्र** – छिद्र. **रुधिर** – रक्त. **खल** – दुष्ट. **नीती** – सदाचाराचे नियम.

प्रस्तुत प्रार्थना ही काव्यानंदासाठी घेतली असून ती विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावी.

## २. संतवाणी

## (अ) अंकिला मी दास तुझा

**संत नामदेव** (१२७०-१३५०) :

वारकरी संप्रदायातील थोर संतकवी. संत नामदेवांची अभंगरचना अतिशय उत्कट असून त्यांच्या अभंगाची भाषा सुबोध, सरळ, साधी आहे. त्यांनी हिंदीतही रचना केली आहे. पंजाबात जाऊन त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवली. शिखांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' या ग्रंथात त्यांची एकसष्ट कवने समाविष्ट असून 'भक्त नामदेवजी की मुखबानी' या नावाने ती प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत अभंगामध्ये संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे.

**अग्निमाजि पडे बाळू ।**
**माता धांवें कनवाळू ।।१।।**

**तैसा धांवें माझिया काजा ।**
**अंकिला मी दास तुझा ।।२।।**

**सर्वेचि झेंपावें पक्षिणी ।**
**पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।**

**भुकेलें वत्सरावें ।**
**धेनु हुंबरत धांवे ।।४।।**

**वणवा लागलासे वनीं ।**
**पाडस चिंतीत हरणी ।।५।।**

**नामा म्हणे मेघा जैसा ।**
**विनवितो चातक तैसा ।।६।।**

सकलसंतगाथा खंड पहिला : श्रीनामदेवमहाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक १६६१
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**शब्दार्थ :**

**कनवाळू** – दयाळू. **काज** – काम. **अंकिला** – अंकित झालेला. **सवें** – लगेच. **वत्सरावें (वत्सरवें)**– वासराच्या आवाजाने. **पाडस** – हरिणीचे पिल्लू.

## कृती

**(१) पाठाच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा.**

(अ) माता धावून जाते·····

(आ) धरणीवर पक्षिणी झेपावते·····

(इ) गाय हंबरत धावते·····

(ई) हरिणी चिंतित होते·····

**(२) आकृती पूर्ण करा.**

कवितेतील माता आणि हरिणीचे वर्णन करणारे शब्द

↓ माता [ ]

↓ हरिणी [ ]

**(३) कोण ते लिहा.**

(अ) परमेश्वराचे दास– [ ]

(आ) मेघाला विनवणी करणारा– [ ]

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

‘सवेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।’

(आ) आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे कवितेतून व्यक्त झालेले वर्णन तुमच्या शब्दांत सांगा.

(इ) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.

(ई) पक्ष्याच्या/प्राण्याच्या आपल्या पिलाशी असलेल्या संबंधाबाबत तुमचा अनुभव लिहा.

❖ ❖ ❖

9KESVL

## २. संतवाणी

## (आ) योगी सर्वकाळ सुखदाता

**संत एकनाथ** (१५३३ ते १५९९) :

भागवत संप्रदायातील थोर संतकवी. सोळाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनाचे प्रवर्तक. 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण' इत्यादी ग्रंथ, अभंग, आख्याने, गौळणी, पदे, भारुडे अशी त्यांची बहुआयामी लेखनसंपदा आहे. बहुश्रुतता, समन्वयशीलता, सामान्यांच्या उद्धाराची तळमळ, आलंकारिकता, पौराणिक कथासंदर्भ, सुबोधता हे संत एकनाथांच्या काव्याचे प्रमुख विशेष होत.

प्रस्तुत अभंगात योगी पुरुष आणि पाण्याची तुलना केली असून, योगी पुरुष हा पाण्यापेक्षाही श्रेष्ठ आहे, हे विविध दृष्टान्तांतून संत एकनाथ यांनी स्पष्ट केले आहे.

**जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।**
**जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।**
**जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।**
**उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।**
**उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।**
**योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।**
**उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।**
**योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।**
**मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।**
**अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।**
**तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।**
**जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।**

'एकनाथी भागवत' शासकीय प्रत : अ. ७.
ओव्या ४६५ ते ४६८, ४७३ ते ४७४

**शब्दार्थ :**

**जेवीं** – ज्याप्रमाणे. **चकोर** – एक पक्षी. हा चंद्रकिरणे पिऊन जगतो अशी कल्पना आहे. **पांखोवा** – पक्षिणीचे पंख. **जीवन** – पाणी. **क्षाळणे** – धुणे. **सबाह्य** – आतून व बाहेरून. **उदक** – पाणी. **तृषित** – तहानलेला. **निववीणे** – संतुष्ट करणे, शांत करणे. **निजज्ञान** – आत्मज्ञान.

## कृती

**(१) खालील चौकटी पूर्ण करा.**


(अ) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी

(आ) पिलांना सुरक्षितता देणारे

(इ) स्वत:ला मिळणारा आनंद

(ई) व्यक्तीला सदैव सुख देणारा

**(२) खालील आकृती पूर्ण करा.**




**(३) खालील तक्ता पूर्ण करा.**

**योगीपुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.**

| योगीपुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| | |

**(४) खालील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द शोधा.**

(अ) जीभ– (आ) पाणी– (इ) गोडपणा– (ई) ढग–

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

(आ) 'योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

❖ ❖ ❖


9HT2C6

# भाषाभ्यास


## रसविचार

मानवी जीवनात कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतीही कलाकृती पाहताना, तिचा आस्वाद घेताना मानवी मनात भावनांचे अनेक तरंग उठतात. कलेचा आस्वाद घेण्याचे कौशल्य प्रत्येकाच्या स्वानुभव क्षमतेवर अवलंबून असते. ही अनुभवक्षमता शालेय वयापासून वृद्धिंगत व्हावी, या दृष्टीने 'रसास्वाद' ही संकल्पना आपण समजून घेऊया. मानवाच्या अंत:करणात ज्या भावना स्थिर व शाश्वत स्वरूपाच्या असतात, त्यांना 'स्थायिभाव' असे म्हणतात. उदा., राग, दु:ख, आनंद इत्यादी.

कोणत्याही कलेचा आस्वाद घेताना या भावना जागृत होतात व त्यांतून रसनिष्पत्ती होते.




स्थायिभावांची उत्कट स्थिती म्हणजे रस होय.




साहित्यामध्ये गद्य-पद्य घटकांचा आस्वाद घेताना आपण अनेक रस अनुभवतो. गद्य-पद्य घटकांतून चपखलपणे व्यक्त होणारा आशय, दोन ओळींमधील गर्भितार्थ, रूपकात्मक भाषा, पद्य घटकांतील अलंकार, सूचकता, प्रसाद, माधुर्य हे काव्यगुण पदोपदी प्रत्ययास येतात. अर्थपूर्ण रचनांचा रसास्वाद घेण्याची कला आत्मसात झाली, की त्यामुळे मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. भाषासमृद्धीसाठी 'रसास्वाद' या घटकाकडे आवर्जून लक्ष देऊया.

मनातील वैयक्तिक दु:खाची भावना जर साहित्यातून अनुभवाला आली तर तिथे करुण रसाची निर्मिती होते. मनातल्या दु:खाचा निचरा, विरेचन होऊन (कॅथर्सिसच्या सिद्‌धांतानुसार) कारुण्याच्या सहसंवेदनेचा अनुभव घेता येतो आणि या प्रक्रियेतून काव्याचा आस्वाद घेता येतो. तसेच वैयक्तिक दु:खाची भावना सार्वत्रिक होऊन तिचे उदात्तीकरण होते. अशा भावनांच्या उदात्तीकरणामुळे मी व माझा या पलीकडे जाऊन व्यक्तींच्या व समाजाच्या भावनांचा आदर करण्याची वृत्ती जोपासली गेली तर नात्यांमधील, व्यक्तीव्यक्तींमधील भावसंबंधाचे दृढीकरण होते.

कोणतीही कलाकृती अभ्यासताना त्या कलाकृतीचा आस्वाद घेता आला तरच ती आनंददायी ठरते. एखादी कलाकृती दिसणे, ती पाहणे व ती अनुभवणे, हे कलाकृतीच्या आस्वादाचे टप्पे आहेत. केवळ डोळ्यांनी नव्हे तर मनाने कलाकृती अनुभवता आली पाहिजे. कोणत्याही कवितेचे, पाठाचे आकलन होऊन संवेदनशीलतेने कलाकृतीतील अर्थ, भाव, विचार, सौंदर्य टिपता आले पाहिजे. कवीला काय सांगायचे आहे याविषयी दोन ओळींमधील दडलेला मथितार्थ समजला तरच कवितेचे पूर्णांशाने आकलन होते व त्याच्या रसनिष्पत्तीचा आनंद घेता येतो. आपल्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ, प्रत्येक कविता, प्रत्येक घटक यांकडे पाहण्याची अर्थ समजून घेण्याची ही आस्वादक दृष्टी विकसित झाली, तर भाषेचा खरा आनंद प्राप्त होईल.

# ३. शाल

**रा. ग. जाधव** (१९३२ ते २०१६) :

कवी, समीक्षक, ललितलेखक. साहित्याची जाण आणि बहुआयामी समीक्षावृत्ती यातून त्यांची समीक्षा विकसित झाली. व्यापक वाङ्मयीन दृष्टिकोन आणि चिंतनात्मकता ही त्यांच्या समीक्षेची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या समीक्षाविषयक लेखनाची तीसहून अधिक पुस्तके आहेत. त्यांचे 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', 'आनंदाचा डोह', 'निळी पहाट', 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', 'आगळीवेगळी नाटकं' ही समीक्षात्मक पुस्तके; 'वियोगब्रह्म', 'मावळतीच्या कविता' हे कवितासंग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. १९७० ते १९९० या काळात ते विश्वकोशाच्या संपादनात सहभागी होते.

शालीभोवती असलेल्या लेखकाच्या आठवणी या पाठातून व्यक्त झाल्या आहेत. 'शाल' ही प्रतीकात्मक आहे. शालीमुळे येणारा 'शालीनतेचा' संदर्भ अंतर्मुख करणारा आहे. पाठातील औदार्याचे उदाहरण हे माणसाची संवेदनशीलता जपणारे आहे. वस्तूंच्या संदर्भातील आठवणींचे मोल महत्त्वाचे असते. कोणत्याही निर्जीव वस्तूशी निगडित असलेले संदर्भ मानवी भावना तरल ठेवतात. वस्तूशी निगडित कोणतीही आठवण असो अथवा प्रसंग, त्याचे मानवी संदर्भच सर्वार्थाने महत्त्वाचे ठरतात.

एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, ''तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित'शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हे तर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती. शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन. शालींच्या वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही, कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले, ''शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन, भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्वांना एकेक शाल लगेचच नेऊन देईन.'' यावर तो शालीन कवी मनापासून हसला.

शालीमुळे शालीनता येते की जाते? या प्रश्नाचे माझे उत्तर 'जाते' असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गोठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना!

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

पुढे चार-पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच चिरगुटे अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे!

मी म्हटले, ''बाबा, तुम्ही मला ओळखले?''

त्याने नकारार्थी मान हलवली.

मग मीच म्हटले, ''बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हांला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?''

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, ''हे भल्या माणसा, तू लई मोठा! म्यास्नी शाली दिल्या! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट! मी शाली इकल्या व दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं हे असलं बिकट जिणं! तुझं लई उपकार हायेत बाबा.''

शालीची शोभा आणि ऊब व पोटाची आग आणि अन्नाची ऊब!

भुकेल्यास अन्न द्यावे, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात!

(छात्र प्रबोधन, दीपावली विशेषांक २०१२)

## कृती

**(१) उत्तरे लिहा.**

(अ) पु. ल. व सुनीताबाई यांनी दिलेल्या शालीचा लेखकाने पाठात केलेला उल्लेख

(आ) २००४ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

(इ) पाठात उल्लेख असणारी नदी

(ई) सभासंमेलने गाजवणारे कवी

**(२) शालीचे पाठात आलेले विविध उपयोग लिहा.**

शालीचे उपयोग

**(३) खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती लिहा.**

(अ) एका बाईचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत होते.

(आ) म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे पाहिले.

**(४) कारणे शोधून लिहा.**

(अ) एका बाईच्या बाळासाठी शाल दिल्याच्या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा जास्त होती, कारण...........

(आ) शालीच्या वर्षावामुळे नारायण सुर्वे यांची शालीनता हरवली नाही, कारण ...........

(इ) लेखकांच्या मते शालीमुळे शालीनता जाते, कारण ...........

**(५) आकृती पूर्ण करा.**

लेखकांनी भूषवलेली पदे

**(६) खालील वाक्यांतील कृतींतून किंवा विचारांतून कळणारे लेखकाचे गुण शोधा.**

(अ) बाईला हाक मारून खिडकीतून शाल व नोटा दिल्या.

(आ) खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते!

(इ) हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या.

**(७) खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

(अ) जवळपास (आ) उलटतपासणी

**(८) अधोरेखित शब्दासाठी योग्य समानार्थी शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) नारायण सुर्वे यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे.

(आ) खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या.

(इ) मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून निकटवर्ती मित्राकडे ठेवले.

**(९) 'पुलकित' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**(१०) शालीनपासून शालीनता भाववाचक नाम तयार होते. त्याप्रमाणे 'ता', 'त्व', 'आळू' आणि 'पणा' हे प्रत्यय लावून तयार झालेली भाववाचक नामे लिहा.**

| – ता | – त्व | – आळू | – पणा |
|---|---|---|---|
| | | | |

**(११) अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) लेखक सुंदर लेखन करतात.

(आ) तो मुलगा गरिबांना मदत करतो.

**(१२) स्वमत.**

(अ) 'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) 'भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग', याविषयी तुमचे मत लिहा.

(इ) लेखकाच्या भावना जशा 'शाल' या वस्तूशी निगडित आहेत तशा तुमच्या आवडीच्या वस्तूशी निगडित असलेल्या भावना, तुमच्या शब्दांत लिहा.

9X2XDT

❖ ❖ ❖

# ४. उपास

**पु. ल. देशपांडे** (१९१९ ते २०००) :

थोर मराठी साहित्यिक. विनोदी लेखक, नाटककार, प्रवासवर्णनकार, चतुरस्र कलावंत. सूक्ष्म निरीक्षण, मार्मिक आणि निर्मळ विनोद, तरल कल्पनाशक्ती आणि भाषेचा कल्पक व चमत्कृतीपूर्ण उपयोग करण्याचे कौशल्य हे त्यांचे लेखनविशेष. 'तुका म्हणे', 'तुझे आहे तुजपाशी', 'अंमलदार', 'सुंदर मी होणार', 'ती फुलराणी' इत्यादी स्वतंत्र आणि रूपांतरित नाटके; 'सदू आणि दादू', 'विठ्ठल तो आला आला', इत्यादी एकांकिका संग्रह; 'खोगीरभरती', 'असा मी असामी', 'खिल्ली', 'बटाट्याची चाळ', 'हसवणूक' इत्यादी विनोदी लेखसंग्रह; 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्याच्या देशा' इत्यादी प्रवासवर्णने; 'व्यक्ती आणि वल्ली', 'गणगोत', 'मैत्र' इत्यादी व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा आहे. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. भारत सरकारने 'पद्‌मभूषण' या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

मध्यमवर्गीय व्यक्तीचा संकल्प व संकल्पपूर्तीत कसे अंतर पडते आणि संकल्प करणाऱ्या व्यक्ती कशा हास्यास्पद ठरतात, याचे मजेदार चित्रण प्रस्तुत लेखात पु. ल. देशपांडे यांनी केले आहे.

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता ही माझी 'नाही ती भानगड' आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण' आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!' अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली; पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो. 'एकशे एक्क्याऐंशी पौंड.' रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता. ''घोरत तर असता रात्रभर!'' अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

''दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!'' अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्‌दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ– सोकाजी त्रिलोकेकर.

''तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस.''

''हो! 'म्हणजे कुठं राहाता?' म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहातो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खी: खी: खी:!'' जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!

पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. ''ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत–तू बटाटा सोड.'' मी काय काय सोडले असता माझे वजन घटेल याची यादी बटाट्यापासून सुरू झाली.

''बटाट्याचं ठीक आहे; पण पंत, आधी भात सोडा.'' एक सल्ला. ''भातानं थोडंच लठ्ठ व्हायला होतं? आमच्या कोकणात सगळे भात खातात. कुठं आहेत लठ्ठ? तुम्ही डाळ सोडा.'' काशीनाथ नाडकर्णी.

''मुख्य म्हणजे साखर सोडा.''

''मी सांगू का? मीठ सोडा.''

''लोणी–तूप सोडा–एका आठवड्यात दहा पौंड वजन घटलं नाही तर नाव बदलीन. आमच्या हेडक्लार्कच्या वाइफचं घटलं.''

''तेल आणि तळलेले पदार्थ आधी सोडा.'' बाबूकाका.

''दिवसा झोपणं सोडा.''

''खरं म्हणजे पत्ते खेळायचं सोडा. बसून बसून वजन वाढतं.''

मी मात्र या सर्व जनांचे ऐकून मनाचे करायचे ठरवले होते. पहिला उपाय म्हणून मी 'आहारपरिवर्तन' सुरू केले.

साखरेत सर्वांत अधिक कॅलरीज असतात, म्हणून प्रथम बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवशी विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. ''मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर.'' एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीच मला फरक जाणवायला लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते, म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला. नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता, याचा अनुभव ती खाल्ल्यावर आला आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते–म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'तला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

शेवटी मला राहवेना. भज्यांची सहावी प्लेट उडवल्यावर, मी अत्यंत केविलवाण्या स्वरात 'सध्या मी 'डाएट'वर असल्याचे' सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले.

''अरे पंत, खाण्याचा आणि वजनाचा काय संबंध?'' भिकोबा मुसळे म्हणाला, ''मी बघ एकवीस गुलाबजाम खाल्ले–एवढंच काय, आपण तर आयुष्यात एक्सरसाईज नाही केला. तुझी कुंभ रास नि कुंभ लग्न आहे. नुसता वायू भक्षण करून राहिलास तरी तू असाच जाड्या राहाणार. लठ्ठपणा काय आपल्या हातात आहे?''

''नॉन्सेन्स!'' जगदाळे ओरडला, ''रनिंग कर रोज.''

''रनिंगपेक्षा देखील दोरीवरच्या उड्या मारा. बरं का पंत, माझ्या सिस्टरचं वेट चाळीस पौंड उतरलं दोरीवरच्या उड्यांनी.'' कु. कमलिनी केंकरे म्हणाली.

शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधले भजे उचलले.

कुटुंबाचा मात्र माझ्या 'डाएटच्या' बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, कारण रोज काही काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहादेखील सुरुवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला.

''चहा सुरुवातीला बिनसाखरेचा असूनही कडू लागला नाही आणि आता का लागतो तेवढं सांग'', असे म्हटल्यावर कुटुंबाकडून खुलासा मिळाला.

''हेच ते–म्हटलं ते काय उगीच? अहो, म्हणजे सुरुवातीला मी तुम्हांला जो बिनसाखरेचा चहा दिला तो बिनसाखरेचा नव्हताच मुळी!''

''नव्हता? मग मला बिनसाखरेचा चहा म्हणून काय सांगितलंस?''

''अहो, थोडीशीच राहिली होती साखर, ती संपेपर्यंत म्हटलं घालू. काल संपली. आजपासून बिनसाखरेचा चहा केलाच की साखर न घालता.''

''म्हणजे खलास! अग, किती लाख कॅलरीज गेल्या असतील माझ्या पोटात. कसलं कमी होतंय माझं वजन? पण

सांगितलं का नाहीस मला?''

''उगीच आरडाओरडा नका करू. वजनाचं ते काय मेलं? होईल हळूहळू कमी आणि कोणाचं मागून खात नाही म्हणावं आम्ही. स्वत:च कमवून खातो म्हणावं. वाढलं तर वाढू दे वजन.'' मुलांना देण्यासाठी लाडू काढून बशी ठेवत आणि माझ्या वजनक्षय-संकल्पाला आणखी नवे सुरुंग लावीत ती उद्गारली.

''लाडू कशाला केलेस? साखर असेल त्यात!''

''इश्श! साखरेशिवाय लाडू आमच्या नाही घराण्यात केले कुणी!''

तात्पर्य, चहा बिनसाखरेचा होता हे खरे; परंतु लाडवाच्या रूपाने काही कॅलरीज पोटात गेल्याच!

दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व पहिली उडीच शेवटची ठरली, कारण आठ गुणिले दहाच्या आमच्या दिवाणखान्यात प्रथम दोरी संपूर्ण फिरवणे अवघड. एकदा डोक्यावरून दोरी पलीकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाटल्या खाली घेऊन आली. दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरी आणि अर्धवट घरात राहून दोरी फिरवली ती आचार्य बर्व्यांच्या गळ्यात. त्यांचा माझ्यावर आधीच राग होता. मी उपास करतो हे कळल्यावर चाळीतली सारी मंडळी समाचाराला येऊन गेली; परंतु आचार्य बाबा बर्वे शेजारच्या खोलीत असूनही आले नाहीत, कारण 'उपास' हे त्यांचे खास राखीव कुरण होते.

''हा दुष्टपणा माझ्या गळ्यात दोरी अडकवून केलात हे ठीक झालं; पण तुमच्या वयाला न शोभणाऱ्या ह्या धिंगामस्तीला दुसरा कोणी माझ्यासारखं बळी पडला असता, तर तुमची धडगत नव्हती. मी तुम्हांला क्षमा करतो.''

''पण... मी हे मुद्दाम केलं नाही, आचार्य! अहो वजन कमी करायला दोरीच्या उड्या मारतोय मी.''

''काही उपयोग होणार नाही!''

''का?''

''का म्हणजे? जिभेवर ताबा नाही तुमचा. संयम हवा. मनाची एकाग्रता हवी. त्यासाठी प्रथम म्हणजे काही गोष्टी सोडाव्या लागतील.''

''आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही, बाबा?''

''ठीक आहे. प्रथम बोलणं सोडा.''

''बोलणं सोडू?''

''अजिबात! खाण्यासाठी तोंडाचा वापर कमी करायचा एवढं पाहिलं तुम्ही; पण बोलण्यासाठीदेखील त्याचा वापर बंद केल्याशिवाय तुमची जीभ ताब्यात राहाणार नाही.''

''पण मला बोललंच पाहिजे, बाबा.'' मी केविलवाण्या स्वरात ओरडलो.

''का पण? एवढा संयम नाही तुमच्यात? मौनाचं सामर्थ्य मोठं आहे. मौन ही शक्ती आहे. मौन ही...''

उड्या मारायच्या माझ्या दोरीचे एक टोक हातात धरून बाबा एक तास 'मौनाचं महत्त्व' या विषयावर बडबडत होते. शेवटी त्यांचा वाक्प्रवाह अडवून मी ओरडलो, ''पण बाबा, मी बोललो नाही तर खाऊ काय?''

''म्हणजे? बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काय?''

''मी टेलिफोन-ऑपरेटर आहे, बाबा. दिवसभर बोलावंच लागतं मला.''

''मग कसलं वजन उतरवणार तुम्ही?'' अत्यंत कारुण्यपूर्वक कटाक्ष टाकून बाबा गेले आणि त्यांच्या गळ्यात पडलेली दोरी मघाशी मी गच्च आवळली का नाही, या विचाराने मला पश्चात्ताप झाला.

मग मात्र मी चिडलो आणि निश्चय केला की बस्स. यापुढे उपास वजन उतरेपर्यंत उपास! मला मी काटकुळा झाल्याची स्वप्ने पडू लागली. भरल्या ताटावरून मी उठू लागलो. बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच काय; पण बिनचहाचा देखील चहा मी पिऊ लागलो. साखर पाहिली, की माझ्या अंगाचा तिळपापड होऊ लागला. केवळ फळांवर मी जगू लागलो. लिंबाचा रस तर मला अमृतासारखा वाटू लागला. धारोष्ण दुधासाठी मी अधूनमधून अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागलो. दोरीवरच्या उड्या केवळ खालच्या मजल्यावरील मंडळींच्या 'दुष्टपणाने व आकसाने' केलेल्या तक्रारींमुळे

थांबवाव्या लागल्या. दहा उड्या पाय न अडकता मारण्यापर्यंत मी पोचलो होतो. कचेरी सुटली, की मी गिरगाव रस्त्याने धावत येऊ लागलो. केवळ पौष्टिक आणि सात्त्विक आहार सुरू केला. जवळजवळ दहाबारा दिवस हा क्रम चालू होता. माझ्यातला फरक मलाच कळत होता. लहान मुले बी पेरले की रोप किती वाढले हे रोप उपटून पाहतात त्याप्रमाणे रोज संध्याकाळी काट्यावर वजन करावे असे वाटत होते मला; पण मी ती इच्छा दाबून धरली. बरोबर एक महिन्याने मी वजन करणार होतो. एक महिनाभर तुपाचा थेंब माझ्या पोटात जाणार नव्हता. केवळ दूध! दुर्दैवाने रोज गाईचे धारोष्ण दूध मिळण्याची सोय नव्हती; पण एकूण आहारव्रत जोरात चालू ठेवले.

पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरून कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे मुख्यत: चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकूण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळींचे आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते. जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करत होती त्यांनीच ''पंत, फरक दिसतो हं!'' अशी कबुली द्यायला सुरुवात केली.

जनोबा रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही ''पंत, भलतेच काय हो रोडावलेत.'' असे मान्य करावे लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची म्हणजे मूठभर मांस वाढण्याची; पण असली तुरळक तारीफ ऐकून मी चळण्यासारखा नव्हतो.

इतक्या असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी तरी माझे वजन घटले पाहिजे अशी माझी खात्री होती व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले. महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते. एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन...

मिनिटभर माझा विश्वासच बसेना. एकशे ब्याण्णव पौंड आणि भविष्य होते : 'आप बहुत समझदार और गंभीर है!'

हल्ली मी वजन आणि भविष्य या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे आणि विशेषत: डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे, छे, वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो.

(बटाट्याची चाळ)

**शब्दार्थ :**

**हात दाखवून अवलक्षण** – आपण होऊन संकट ओढवून घेणे. **सुरुंग लावणे** – एखादा बेत उधळवून लावणे. **अंगाचा तिळपापड होणे** – संताप होणे. **मूठभर मांस वाढणे** – स्तुतीने हुरळून जाणे. **आणेली** – जुन्या काळातील एक नाणे.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **पंतांची आस्था वाढू लागलेल्या गोष्टी**

(आ) **पंतांच्या आहारतज्ज्ञ मित्रांनी वर्ज्य करायला सांगितलेल्या आहाराव्यतिरिक्तच्या गोष्टी**

(इ) **पंतांच्या आहारनियंत्रणाविषयी त्यांच्या पत्नीच्या प्रतिक्रिया**

**(२) कारणे शोधा.**

(अ) वजन कमी करण्यासाठी न बोलण्याचा उपाय पंतांना जमणार नव्हता, कारण ....

(आ) बाबा बर्वे पंतांच्या समाचाराला आले नाहीत, कारण ....

**(३) पाठाधारे खालील संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) भीष्म प्रतिज्ञा-

(आ) बाळसेदार भाज्या-

(इ) वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो-

(ई) असामान्य मनोनिग्रह-

**(४) खालील शब्दसमूहासाठी पाठातून एक शब्द शोधा.**

(अ) ठरवलेले व्रत मध्येच सोडणे

(आ) वजन घटवण्यासाठी आहार बदलण्याची कल्पना

(इ) भाषेचा (नदीसारखा) प्रवाह

**(५) अचूक शब्द ओळखून लिहा.**

(अ) वडीलांसोबत/वडिलांसोबत/वडिलानसोबत/वडीलानसोबत

(आ) तालमिला/तालमीला/ताल्मीला/ताल्मिला

(इ) गारहाणी/गाऱ्हाणि/गाऱ्हाणी/ग्राहाणी

**(६) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| वाक्प्रचार | वाक्याचे अर्थ |
|---|---|
| (अ) हात दाखवून अवलक्षण | (१) खूप संताप येणे. |
| (आ) सुरुंग लावणे. | (२) स्तुतीने हुरळून जाणे. |
| (इ) अंगाचा तिळपापड होणे. | (३) आपण होऊन संकट ओढवून घेणे. |
| (ई) मूठभर मांस चढणे. | (४) एखादा बेत उधळवून लावणे. |

**(७) स्वमत.**

(अ) दोरीवरच्या उड्या मारण्याच्या प्रसंगातील तुम्हांला समजलेला विनोद स्पष्ट करा.

(आ) पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(इ) पाठातील तुम्हांला सर्वांत आवडलेला विनोद कोणता? तो का आवडला ते स्पष्ट करा.

(ई) तुम्ही एखादा संकल्प केला आणि तो पूर्ण केला नाही तर कुटुंबातील व्यक्ती कोणत्या प्रतिक्रिया व्यक्त करतील, याची कल्पना करून लिहा.

❖ ❖ ❖

9XBTFG

## ❖ मोठे होत असलेल्या मुलांनो... (स्थूलवाचन)

**डॉ. अनिल काकोडकर** (१९४३) :

भारतातील सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ. भारतीय अणुऊर्जा मंडळाचे माजी अध्यक्ष. भारत सरकारच्या 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित.

मोठे होत असलेल्या मुलांना उद्देशून डॉ. काकोडकर यांनी हे पत्र लिहिले आहे. त्यांचे 'बार्क'मधील अनुभव मुलांचे भावविश्व निश्चित समृद्ध करतील. कुठल्याही मोठ्या कामाची सुरुवात असंख्य छोट्या छोट्या कामांमधून होत असते, म्हणून कोणतेही काम कमी दर्जाचे न मानता ते करायची सवय ठेवली तर मोठी कामे करताना अडचणी येत नाहीत, असा संदेश ते या पाठात देतात.

**मोठे होत असलेल्या मुलांनो,**

या पत्रातून मी तुम्हांला माझे 'बार्क'मधील दोन अनुभव सांगणार आहे. मला खात्री आहे, माझे हे दोन अनुभव तुम्हांला अधिक अभ्यास करून तुमच्या भूमिका निश्चित करायला मदत करतील.

तर मुलांनो, आधी मी माझे दोन अनुभव सांगतो. हे दोनही अनुभव मी कॉलेज संपवून 'बार्क'मध्ये ट्रेनिंग स्कूलला गेलो तेव्हाचे आहेत. अरे हो, बार्क म्हणजे काय असा प्रश्न तुम्हांला पडला असेल. सांगतो...'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. होमी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला, म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिले आहे. तर बार्क ही संस्था आता प्रचंड मोठी आहे; पण मी तिथे ट्रेनिंग स्कूलला गेलो तेव्हा ती संस्था सुरू होऊन जेमतेम सात वर्षे झाली होती. आम्ही जवळपास शंभर मुले-मुली होतो. मी ट्रेनिंग स्कूलला असताना होमी भाभा तीन-चार वेळा आले होते. प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व होतं ते. एकदा आम्ही त्यांना विचारलं, ''आम्ही इतकी मुलं-मुली आहोत; पण सर्वांना पुरेल इतकं काम कुठे आहे इथे?'' ते म्हणाले, ''तुम्ही त्याची काळजी का करता? तुम्ही सर्वजण संशोधन करत रहा, त्यासाठी सरकारला खर्च किती येतो याचा आत्ता विचार करू नका, मात्र एक करा, तुम्ही स्वत:च काम निर्माण करा. आपण काय काम करायचं हे तुम्ही स्वत:च ठरवा. बॉसने सांगितलं तेवढंच काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामच नाही असं समजायचं, हे चूक आहे. ही प्रवृत्ती गेली पाहिजे.'' भाभांनी सांगितलेला हा मुद्दा माझ्या मनावर कोरला गेला आणि मुलांनो, स्वानुभवाने सांगतो एकदा हे लक्षात आलं ना, तर स्काय इज द लिमिट. बोट धरून चालवणं किंवा दिशा दाखवणं हे पहिल्या आठ-दहा वर्षांपर्यंत ठीक आहे, आवश्यकही आहे; पण अंतिमत: स्वत:च स्वत:ला सक्षम करता आलं पाहिजे, ऊर्जा मिळवता आली पाहिजे आणि स्वत:चे मार्ग शोधता आले पाहिजेत.

आता दुसरा अनुभव सांगतो. ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झालो. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर मला काम करायला सांगण्यात आलं. आमच्याकडे त्यासाठी यंत्रसामग्री होती; पण कोणीही ती वापरली नव्हती, म्हणून मी म्हणालो, ''मी यावर काम करतो; पण यासाठी मला एक वेल्डर व एक फोरमन यांची गरज आहे.'' तेव्हा मला सांगण्यात आलं, ''तुला आता काहीच मदत मिळणार नाही, तुला स्वत:लाच सर्व करावं लागेल.'' वरिष्ठांची आज्ञा म्हणून मी सुरुवात केली आणि बरीच धडपड करून ते काम पूर्ण केलं, मग त्यांनी त्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवली. 'हे करूया, ते करूया', असं बरंच काय काय म्हणाले आणि मग विचारलं, ''आता सांग, तुला काय पाहिजे? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आणखी जे हवे असेल ते सर्व मिळेल.'' यावर मी म्हणालो, ''आता मला काहीच नको. मी स्वत: सर्व करीन.'' तेव्हा ते म्हणाले, ''काम सुरू करण्याआधीच लोक काय काय मागण्या करतात आणि या वृत्तीमुळेच आतापर्यंत ते काम झालेलं नव्हतं, म्हणून आम्ही तुला वेल्डर व फोरमन द्यायला 'नाही' म्हणालो होतो. मात्र आता तुझ्या हाताखाली पाहिजे तेवढे लोक घे, आता ते तुझं ऐकतील, कारण त्यांनी पाहिलंय, तू हे करू शकतोस आणि आता हेही लक्षात घे, की एकटा माणूस जास्त काम करू शकत नाही.'' थोडक्यात काय, तर तुम्ही करू शकता हे आधी दाखवा, मग इतरांना काम सांगा. आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणं योग्य नाही. हा धडा त्या दुसऱ्या अनुभवातून मी शिकलो.

तर मुलांनो, जवळपास ५० वर्षांपूर्वीचे हे दोन अनुभव मला आजही खूप महत्त्वाचे वाटतात. यातील आशय तुम्ही आताच नीट समजून घेतला तर मोठे होण्याच्या प्रक्रियेत तुम्हांला त्याचा फायदाच होईल, याची मला खात्री आहे.

## कृती

**(१) टिपा लिहा.**

(अ) बार्क. (आ) डॉ. होमी भाभा.

**(२) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.**

**(३) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांस वाटते?**

**(४) 'आधी केले मग सांगितले', या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.**

**(५) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान स्वानुभवातून स्पष्ट करा.**

**उपक्रम :** आंतरजालाच्या साहाय्याने कोणत्याही दोन भारतीय शास्त्रज्ञांची माहिती मिळवा.

## अपठित गद्य आकलन

- **उतारा वाचून त्यावरील कृती करा.**

(अ) वैशिष्ट्ये लिहा.

विद्वत्तेची वैशिष्ट्ये
↓ ↓ ↓ ↓

विद्वत्ता कोणाकडेही असो ती क्षणात मिळवता येणारी बाब नाही. ज्याप्रमाणे झाडाची मुळे एकदम खोल-खोल जाऊ शकत नाहीत, त्यासाठी महिने-वर्षे लागतात; परंतु जेवढी खोल मुळे असतात, तेवढा त्या झाडाचा पाया भक्कम असतो. तसेच विद्वत्तेचेही आहे. जेवढ्या प्रयत्नाने ती मिळवाल तेवढे प्रभावी तुमचे व्यक्तिमत्त्व असेल. आपल्याला एकदाच विजेसारखे चमकायचे, की सूर्यासारखे सातत्याने प्रकाशित राहायचे, हे ठरवायचे आहे. विद्वत्ता ही अशी बाब आहे, जी केवळ वेळेच्या सदुपयोगाने मिळते. बरे, तिला कोणी तुमच्याकडून काढून किंवा चोरून घेऊ शकत नाही. ती मिळवण्यात खूप धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही; पण एकदा ती तुमच्याजवळ आली, की संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशात दिपून जाते. आपला कोणी सन्मान करावा अशी भावनाच मनातून निघून जाते, सर्वजण तुमच्या सहवासात येण्यासाठी, तुमचे आदरातिथ्य करण्यासाठी आतुर असतात. थोडक्यात, विद्वत्ता तुम्हांला सर्व मिळवून देते, ज्याची तुम्ही स्वप्नातही अपेक्षा केलेली नसते.

(आ) खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.

| घटना/कृती | परिणाम |
|---|---|
| (१) झाडाची मुळे खोल जाणे. | (१) ................. |
| (२) प्रयत्नांनी विद्या मिळवणे. | (२) ................. |

(इ) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

(१) विजेसारखे चमकणे-

(२) सूर्यासारखे प्रकाशणे-

- **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.**

(१) संपूर्ण राष्ट्र तुमच्या लखलखत्या प्रकाशाने दिपून जाईल.

- **व्यक्तीला विद्या प्राप्त झाल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी मिळू शकतात ते स्पष्ट करा.**

# ५. दोन दिवस

भाग २

**नारायण सुर्वे** (१९२६ ते २०१०) :

प्रथितयश कवी. ‘ऐसा गा मी ब्रह्म’, ‘माझे विद्यापीठ’, ‘जाहीरनामा’, ‘सनद’, ‘नव्या माणसाचे आगमन’ इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. स्वत:च्या प्रकृतीशी जुळणारी, निवेदनात्मक, संवादाचा वापर प्रभावीपणे करणारी, बोलीभाषेशी जवळीक असणारी, गद्याच्या अंगाने जाणारी विशिष्ट शैली सुर्वे यांनी निर्माण केली. कामगार जीवनाची सुखदु:खे त्यांच्या काव्यलेखनाच्या प्रेरणास्थानी असतात. माणसावरील अपार श्रद्धेतून त्यांची कविता साकारली आहे.

या कवितेतून ‘दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले’ असे जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना ‘भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली’ असे भीषण जीवनसत्य कवीने मांडले आहे; पण हे सत्य मांडताना जगाच्या या शाळेत दु:ख पचवून जगण्याची शिकवण आपल्याला मिळाल्याचे ते सूचित करतात.

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

(ऐसा गा मी ब्रह्म!)

**शब्दार्थ :**

**बरबाद होणे** – वाया जाणे. **हरघडी** – प्रत्येक वेळी. **शेकणे** – तापणे.

## कृती

**(१) कृती पूर्ण करा.**

(अ) 'रोजची भूक भागवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेलेत' या आशयाची कवितेतील ओळ शोधा.

(आ) कवीचा प्रयत्नवाद आणि आशावाद दाखवणारी ओळ लिहा.

**(२) एका शब्दांत उत्तर लिहा.**

(अ) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट

(आ) कवीचा जवळचा मित्र

**(३) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(अ) माना उंचावलेले हात

(आ) कलम केलेले हात

(इ) दारिद्र्याकडे गहाण पडलेले हात

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे'

(आ) 'दु:ख पेलावे आणि पुन्हा जगावे', या वाक्यामागील तुम्हांला जाणवलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) कवितेत व्यक्त झालेल्या कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा.

(ई) 'कवितेत व्यक्त झालेले जीवनसत्य', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

❖ ❖ ❖

9XKPH4

# ६. चुडीवाला

**जयश्री रुईकर (१९३९) :**

प्रसिद्ध लेखिका. त्यांची 'जयपराजय', 'वेदनेला फूल आले' या कादंबऱ्या; 'मृगजळ', 'अंतर्मन', हे कथासंग्रह; 'स्वप्नातील विहीर' ही बालकादंबरी इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

प्रस्तुत पाठात कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करणारे डॉ. शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धन यांच्या अमरावती येथील तपोवनामध्ये संक्रांत आणि ज्येष्ठ पौर्णिमेला कुष्ठरोगी स्त्रिया आणि मुलींना बांगड्या भरणाऱ्या अब्दुलच्या संवेदनशील वृत्तीचे वर्णन केले आहे. या पाठात समाजऋण या मूल्याबरोबरच माणुसकीचे दर्शनही लेखिकेने घडवले आहे.

''अब्बाजान, आज मत जाओ ना तपोवनको.''

''क्यूं बेटे?''

''जाने दे, जाने दे अन्वर. काही बोलून फायदा आहे का? आजचा दिवस म्हणजे तर त्यांच्यासाठी पर्वणीच! एवढं काय आहे त्या तपोवनात कोण जाणे.'' अब्दुलची बायको शन्नू नाराजीच्या सुरात आपल्या मुलाची समजूत काढत म्हणाली. ''मी लवकर येईन बेटा.'' आपल्या वडिलांचे हे बोलणे ऐकून अन्वर खेळायला निघून गेला.

''आज शक्रांत. त्यात मंगळवार. कितीतरी बायका बांगड्या भरायला आणि देवीच्या दर्शनाला येतील आणि आपलं दुकान बंद. रघुभैयाचा धंदा तेजीत चालणार आज आणि उद्या लगेच नवीन वस्तू येईल रघुभैयाच्या घरात आणि तुम्ही? तुम्ही जाऊन बसा त्या तपोवनात.''

''शन्नू, चूप बैठ अभी.''

एका हातात बांगड्यांची पेटी आणि एका हातात पिशवी घेऊन अब्दुलने पायांत चपला सरकवल्या. ''हे बघा, रस्त्यानं कोणी भेटलं तर सांगू नका तपोवनात जातो म्हणून. धंद्यावर परिणाम होतो त्याचा. समजलं?''

अब्दुलने एकवार तिच्याकडे बघितले. तिच्या डोळ्यांतला क्रोध त्याच्या परिचयाचा होता; पण तिच्याकडे बघून आज त्याला तिचा राग आला नाही, तर कीव आली.

अब्दुल बसस्टॉपवर आला. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. बस आली. बांगड्यांची पेटी आणि पिशवी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला. अगदी खिडकीजवळ बसला. पेटी अलगद उचलून त्याने आपल्या मांडीवर ठेवली. गर्दीत कुणाचा धक्का लागला तर...? लाल, हिरव्या, निळ्या रंगीबेरंगी बांगड्यांकडे मोठ्या कौतुकाने त्याने बघितले. बस सुरू होताच थंडगार वाऱ्याचा झोत अधिकच त्रासदायक वाटू लागला. अब्दुलने मफलर कानाला घट्ट लपेटून घेतला. जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली. तपोवनाकडे कोण जातोय कशाला? जेमतेम पाच-सहाच उतारू राहिले बसमध्ये. तपोवनाच्या त्या गोलाकार कमानीकडे अब्दुलचे लक्ष गेले. गेल्या सहा महिन्यांत केवढी फुलली आहे तिच्यावरती वेल. मागे आलो तेव्हा जेमतेम हातभर होती. अब्दुल गेटजवळ आला आणि लहान लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरुवात केली.

''चुडीवाऽला आऽऽला, चुडीऽऽवाला आला.''

आंब्याच्या झाडाखाली असलेल्या चौथऱ्यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी अब्दुलच्या आजूबाजूला जमली. ''त्या लाल रंगाच्या मला...त्या हिरव्या मला...चुडीवाला, माझ्यासाठी आरसा आणला? मागच्या वेळी मी सांगितलं होतं नं?''

अब्दुलच्या आजूबाजूला गर्दीच गर्दी झाली आणि गोंधळ सुरू झाला. प्रत्येकीला प्रथम बांगड्या भरायच्या होत्या.

अब्दुल एकेकीच्या हातांत बांगड्या भरू लागला. त्यांना हव्या तशा; त्यांच्या मनपसंत. त्यांना बांगड्या भरणं म्हणजे एक दिव्यच; पण अब्दुलला ती कला साधली होती. बांगड्या भरल्यानंतरचा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अब्दुलला लाखमोलाचा वाटे. दोन-तीन तास बांगड्या भरण्याचा कार्यक्रम सुरू होता. साऱ्या तपोवनातील तो एक आनंदाचा आणि

चैतन्याचा दिवस! आवाज, गडबड, गोंधळ, चेहऱ्यावरचा आनंद आणि हे सारे वातावरण निर्माण करणारा चुडीवाला अब्दुल म्हणजे तपोवनातील स्त्रियांना, मुलींना अगदी देवदूतासारखा वाटे. वर्षातून दोनदा, संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवनातील स्त्रिया चुडीवाल्याची आतुरतेने वाट पाहत आणि अब्दुललाही तो आनंद बघून विलक्षण समाधान लाभे.

असेच काही दिवस गेले. एक दिवस रघुभैया आला. त्याच्या हाती पोस्टमनने दिलेले पत्र होते.

''अब्दुलमियाँ, तपोवन से चिठ्ठी आयी है आपको.''

''दिखाव... दिखाव.''

''अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे.''

''मग वाचून दाखव नं तूच.''

रघुभैयाने चिठ्ठी मोठ्याने वाचली. चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शन्नू यांना खूपच आनंद झाला. तपोवनात होणाऱ्या संमेलनाच्या प्रसंगी अब्दुलचा खास सत्कार होणार होता आणि त्यासाठी पत्र पाठवून दाजीसाहेबांनी त्याला निमंत्रण दिले होते. दोन दिवसांनीच सत्कार समारंभ होता. कधीही लाभणार नाही असे सत्काराचे भाग्य त्याच्या वाट्याला आले होते. पत्र आल्यापासून तो त्याच आनंदात होता. पुन्हा पुन्हा तो स्वत:च स्वत:ला विचारत होता, सत्कार करण्याएवढे मी काय केले आहे तपोवनासाठी?

अब्दुल तपोवनात आला तेव्हा कार्यक्रम सुरू झाला होता. स्टेजच्या समोर, बाजूला मांडलेल्या खुर्च्यांवर काही निमंत्रित पाहुणेमंडळी बसली होती. अब्दुलला त्यांच्याबरोबर बसायला संकोच वाटला. तो तसाच उभा राहिला. तेवढ्यात खुद्द दाजीसाहेबांनीच त्याला बोलावून जवळच्या खुर्चीवर बसायला लावले. सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीचे अध्यक्षांचे स्वागत वगैरे औपचारिक झाल्यावर दाजीसाहेबांनी बोलायला सुरुवात केली. अब्दुल बघतच राहिला, चौऱ्याऐंशी वर्षांच्या वृद्धाचा ताठपणा, उंच सडसडीत देहयष्टी, तेज:पुंज चेहरा, गौरवर्ण, पांढरेस्वच्छ धोतर, त्यावर बंद गळ्याचा कोट आणि डोक्याला केशरी फेटा. या वयातही आवाजातला खणखणीतपणा आणि बोलण्यातली ऐट यामुळे अब्दुल भारावून बघत राहिला. दाजीसाहेब बोलत होते–

''रामानं सेतुबंधन केलं; पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला. अगदी लहानशी खार; पण तिनंसुद्धा आपल्या शक्तीप्रमाणे सेतुबंधनाला मदत केली. तशीच मदत या तपोवनासाठी देणाऱ्या काही व्यक्ती आम्हांला सुदैवाने लाभल्या आहेत. संक्रांतीला आणि ज्येष्ठ पौर्णिमेला बांगड्या भरण्याचा प्रस्ताव जेव्हा समोर आला होता तेव्हा अनेक बांगडीवाल्यांना भेटून इथं येण्याबद्दल विनंती केली; पण कुणीही माझ्या विनंतीचा स्वीकार केला नाही. अब्दुलमियाँनी मात्र स्वत:हून इथं येण्याचं आश्वासन दिलं आणि दरवर्षी न चुकता अब्दुलमियाँ इथं येतात. येथील भगिनींच्या जीवनात आनंदाचा वर्षाव करतात. वर्षातले दोन दिवस तपोवनात अतिशय आनंदाचे आणि उत्साहाचे असतात. कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता अब्दुलमियाँ न बोलावता दरवर्षी येतात. तपोवनातील स्त्रिया, मुलीबाळी त्यांच्या येण्याकडे डोळे लावून बसलेल्या असतात. अब्दुलमियाँचे हे समाजकार्य, ही मानवसेवा खरोखर फार फार मोठी आहे. अनमोल आहे आणि म्हणूनच आज त्यांच सत्कार करण्याचं ठरवलं आहे. तेव्हा त्या सत्काराचा स्वीकार अब्दुलमियाँनी इथं येऊन करावा.''



अब्दुल स्टेजवर चढला. दाजीसाहेबांनी फुलांचा गुच्छ आणि तपोवनातील लोकांनी तयार केलेली सुंदर फुलदाणी त्याला दिली. टाळ्यांचा कडकडाट झाला. अब्दुल अतिशय भारावून गेला. त्याने चटकन दाजीसाहेबांच्या पायांना स्पर्श

केला. बराच उशीर झाला होता. अमरावतीहून आलेली निमंत्रित मंडळी मोटारीतून जाणार होती. दाजीसाहेबांनी अब्दुलला त्यात बसवले. मोटार धावत होती. अब्दुल विचार करत होता, आज शन्नूला आणायला हवे होते. तिचा घुस्सा तरी कमी झाला असता. आकाशात अष्टमीचा चंद्र हसत होता. आकाश मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते. वातावरण अंतर्बाह्य प्रसन्न वाटत होते. अंबादेवीच्या चौकात मोटार थांबली. अब्दुल खाली उतरला. घरी आला. अब्दुल येताच शन्नू उठली. थाळीत चपाती आणि वांग्याची भाजी घेऊन तिने थाळी अब्दुलसमोर ठेवली. अब्दुल एखाद्या अपराध्यासारखा मान खाली घालून जेवू लागला.

''तू नहीं खायेगी?''

''नहीं, जी नहीं चाहता खानेकू।''

''अन्वर जेवला?''

''जेवला, पण खिम्यासाठी हट्ट धरून बसला होता.''

अब्दुलच्या हातातला घास हातातच राहिला. एकाएकी जेवणावरची इच्छाच मरून गेली. तोंडात घास घोळू लागला.

''कितीदा सांगितलं हा धंदा सोडून दुसरा धंदा सुरू करा; पण...''

शन्नूचे पुढचे बोलणे अब्दुलने ऐकलेच नाही. तो चटकन उठला. हात धुऊन अन्वरच्या शेजारी येऊन पडला. शन्नूचे बोलणे, त्यातला शब्दन्‌शब्द त्याला पाठ होता. कितीदा तरी तेच तेच ते बोलून झाले होते.

''नवीन धंदा...नवीन धंदा...भांडवल नको? कुठून आणणार?'' तो थोडासा जोराने पण शन्नूला ऐकायला जाईल अशा आवाजात बोलला; पण भांडवलापेक्षाही त्याला अब्बाजानपासून चालत आलेला हा बांगड्यांचा धंदा सोडवत नव्हता.

...नवरात्र संपले होते. त्यात धंदा चांगला झाला. लोक आता दिवाळीच्या तयारीला लागले होते. रघुभैय्याने दुकानाला रंग देण्याचे काम काढले होते. अब्दुल दुकानावर आला. त्याचा चेहरा उदास दिसत होता. रघुभैय्याने त्याला आवाज दिला, ''क्यूं, आज दुकान नहीं खोलता?''

''नाही रघुभैया...हे तपोवनच आता दाजीसाहेबांच्या हाती राहिलं नाही. हे कळलं, तेव्हापासून मन नाही लागत धंदा करायला. आता तपोवनाचं काय होईल रे रघुभैया? केवढी मोठी वसाहत! किती रोगी! आता त्यांची कशी काळजी घेतली जाईल रे? आणि आयुष्याचं मोल देऊन तन-मन-धनानं फुलवलेली ती कर्मभूमी सोडण्याच्या कल्पनेनं दाजीसाहेबांना काय वाटलं असेल बरं?'' अब्दुल विलक्षण हळवा झाला.

देवळातल्या पहारेकऱ्याने दोनचे टोले दिले. शन्नू घोरत होती. अन्वर गाढ झोपला होता. अब्दुल उठला. अगदी हलकेच. कोपऱ्यात बांगड्यांच्या पेटीवर ठेवलेल्या पिशवीतील एकेक वस्तू बाहेर काढू लागला. पावडरचा डबा, रुमाल, रिबिनी, पिना, सोनेरी बांगड्या, साध्या बांगड्या, नायलॉनच्या बांगड्या...संक्रांतीला हे सारे तपोवनात नेणार होता. तिथे 'चुडीवाला...चुडीवाला...' म्हणून स्त्रिया, मुलीबाळी धावतधावत त्याच्याजवळ जमणार होत्या. काही काळ तरी सारे विसरून हसणार होत्या आणि त्यांचे हसू बघून अब्दुल मनोमन सुखावणार होता; पण आता...आता सारे संपले होते. स्वत:साठी सारेच जगतात; पण दुसऱ्यासाठी जगण्यातला आनंद? त्या आनंदाचे सुख वर्षातून फक्त दोनदाच अब्दुल अनुभवायचा. पण आता? आता तेही मिळणार नव्हते. एखाद्या वस्त्राचा एकाएकी रंग उडून जावा तशी त्याची जीवनेच्छा एकाएकी उडून गेली.

त्या साऱ्या वस्तूंकडे बघता बघता अब्दुलचे डोळे पाण्याने काठोकाठ भरून आले. त्यात तपोवनाचा परिसर विरघळत होता...हळूहळू...रात्र उतरणीला लागली होती.

**शब्दार्थ :**

**पर्वणी** – दुर्मीळ संधी, शुभकाल. **तेजी** – भरभराट. **झोत** – वाऱ्याचा वेगवान प्रवाह. **गलका करणे** – गोंगाट करणे. **संकोच वाटणे** – मोकळेपणा न वाटणे. **हातभार लावणे** – मदत करणे. **भारावून जाणे** – प्रभावित होणे.

## कृती

**(१) खालील व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांची तुलना करा.**

| अब्दुल | रघुभैया |
|---|---|
| | |
| | |

**(२) खालील विधानांमागील कारणे लिहा.**

(अ) रस्त्यानं कोणी भेटलं तर सांगू नका तपोवनात जातो म्हणून.

(आ) आजचा दिवस म्हणजे त्यांच्यासाठी पर्वणीच.

**(३) गुणविशेष लिहा.**

(अ) दाजीसाहेब

(आ) शन्नोची स्वभाववैशिष्ट्ये

**(४) खालील वाक्यांतील अव्यये शोधा व त्यांचे प्रकार लिहा.**

| वाक्ये | अव्यये | प्रकार |
|---|---|---|
| (अ) अब्दुल जिल्हाधिकारी कचेरीजवळ आला. | | |
| (आ) तो एक आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस. | | |
| (इ) बापरे! केवढी मोठी वसाहत. | | |
| (ई) रघुभैयाने चिठ्ठी भरभर वाचली. | | |

**(५) विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.**

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| (अ) ''अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे.'' | |
| (आ) ''अन्वर जेवला?'' | |

**(६) खालील उदाहरणांचा अभ्यास करा व दोन्ही अलंकाराच्या रचनेतील फरक समजून घ्या. अशा उदाहरणांचा शोध घेऊन त्यांचा सराव करा.**

अब्दुल हा तपोवनातील स्त्रियांना देवदूतासारखा वाटतो. (उपमा अलंकार)

अब्दुल हा तपोवनातील स्त्रियांसाठी जणू देवदूतच. (उत्प्रेक्षा अलंकार)

**(७) स्वमत.**

(अ) सत्यता पटवून द्या– 'अब्दुल एक थोर समाजसेवक'

(आ) शन्नूच्या वागण्यामागील तिचा विचार काय असावा, याविषयी तुमचे मत लिहा.

(इ) तंत्रज्ञानाची जोड देऊन अब्दुलचा मुलगा बांगड्यांचा व्यवसाय कसा वाढवू शकेल, याविषयी तुमचे विचार स्पष्ट करा.

(ई) दुसऱ्याला मदत करण्यातला आनंद ज्या प्रसंगातून मिळू शकतो, असा प्रसंग लिहा.

**उपक्रम :** 'चुडीवाला' यासारख्या इतर व्यवसाय करणाऱ्या एखाद्या व्यावसायिकाची मुलाखत घ्या.

9XUKIR

❖ ❖ ❖

# ७. फूटप्रिन्टस

**डॉ. प्रदीप आवटे (१९६६) :**

प्रसिद्ध कवी, गीतकार, कथाकार, नाटककार. त्यांची 'माझ्या आभाळाची गोष्ट', 'धम्मधारा', 'या अनाम शहरात' हे काव्यसंग्रह; 'जग्गूभैय्या झिंदाबाद', 'जादू की झप्पी', 'आणखी एक स्वल्पविराम' या किशोरांसाठीच्या कथा, कादंबऱ्या; 'अडीच अक्षरांची गोष्ट' हा ललित लेखसंग्रह इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. 'माझ्या आभाळाची गोष्ट' या काव्यसंग्रहाला साहित्य कला यात्री या संस्थेचा पुरस्कार, गीतलेखनासाठी सामाजिक वनीकरण खात्याचा पुरस्कार, राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत सर्वोत्कृष्ट लेखनाचा पुरस्कार यांसारखे पुरस्कार प्राप्त.

ग्लोबल वॉर्मिंगमधून आपल्या धरणीमातेला वाचवण्यासाठी वृक्षसंवर्धनाबरोबरच, वैयक्तिक वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करावा, त्यासाठी आपली जीवनशैली बदलावी असा संदेश प्रस्तुत पाठात लेखकाने दिला आहे. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करून, तंत्रज्ञानाची गंमत सांगणारी ही विज्ञानकथा अंतर्यामी विचार करायला लावणारी आहे.

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून. सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय. आय. टी. कानपूरला शिकत होता. काल संध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. ''काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता?'' हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही बिचाऱ्या वरमल्या होत्या.

''अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ?''

''सॉरी, मावशी खरंच सॉरी,'' आपण त्यांच्या मळकट पायांबद्दल बोललो याचं स्नेहललाही कसंतरी वाटलं. तिला टाचेला फाटलेली, अगदी पातळ झालेली त्यांची चप्पल आठवली. रेखामावशीच्या खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला. सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. तेवढ्यात पावडेकाकाही आले. आज बाबा आणि पावडेकाका कुठल्याशा कार्यक्रमाला जाणार होते. स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं. फरशी पुसणाऱ्या रेखामावशींचं लक्ष पावडेकाकांच्या तळव्याकडं गेलं. एकदम गोजिरा, गुलाबी तळवा. कुठं चिरण्या नाहीत की काही नाही! 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा', रेखामावशी स्वत:शीच पुटपुटल्या. त्यांनी स्वत:च्या पायाकडं पाह्यलं... पायाला किती तरी चिरण्या पडल्या होत्या.. माती धूळ बसून त्या काळ्या पडल्या होत्या. अभिषेक-स्नेहलचे बाबाही तयार होऊन हॉलमध्ये आले.

''मामा, मी एक ॲप तयार केलं आहे. त्या ॲपच्या साह्यानं आपण कोणाचे पाय किती स्वच्छ आहेत, हे सांगू शकतो'', सुमितनं सांगितलं.

''सुमित, अरे, पाय स्वच्छ आहेत की नाही, हे सांगायला ॲपची काय गरज आहे? तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही? अरे, सगळ्यात भारी ॲप डोक्याच्या कवटीत आहे, हे विसरलात की काय तुम्ही लोक?'' बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली.

''मामा, गंमत तर बघ तू माझ्या ॲपची...त्याचं नाव आहे फूटप्रिन्टस'', असं म्हणत सुमितनं आपला स्मार्टफोन काढला.

''सुरुवात करूया रेखामावशींपासून. ज्यांच्या पायाबद्दल स्नेहलदीदीनं नोंदवला होता आक्षेप...!'' स्नेहलचा चेहरा पडला. तिला स्वत:चाच राग आला. सुमितनं आपल्या ॲंड्रॉईड मोबाईलमधलं ॲप उघडलं आणि रेखामावशींना काही प्रश्न विचारायला सुरुवात केली.

''मावशी, तुम्ही राहता कुठं?''

''त्या टेकडीपल्याड'', मावशी म्हणाल्या.

''इथून किती कि. मी. आहे?''

''तीन.''

''तुम्ही कशा आलात इथपर्यंत?''

''गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माज्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते'', अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरस्ती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत?



रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. ''आणि आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस...! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली...एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले...'सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस!!'

''वाऽ पाह्यलंत रेखामावशीचे पाय चंदेरी आहेत. एकदम स्वच्छ. झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे,'' सुमित ओरडला. ''ह्याऽ हे भलतंच!'' रेखामावशींच्या पायाकडे पाहत पावडेकाका म्हणाले.

सुमितनं हलकेच पावडेकाकांच्या गोजिऱ्या तळव्यांकडे पाहिले आणि म्हणाला, ''काका, आपण तुमच्या पायाचं पाहूया का?''

''त्यात पाह्यचं काय? हे बघ, माझे पाय किती स्वच्छ आणि मऊसूत आहेत...!'' पावडेकाका पाय सगळ्यांना दाखवत म्हणाले. ''पण चला काय सांगतंय तुमचं ॲप, ते तरी पाहूया,'' त्यांनी पुस्ती जोडली.

सुमितनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरू केला.

''काका, आता तुम्ही कुठून आलात?''

''विश्रांतवाडीहून.''

''कसे?''

''अर्थातच, कारने.''

''वीस किलोमीटर कारने. तुम्ही एकटेच...!' सुमितची शंका

''हो, का?''

''अच्छा, पण काका आठवड्यातून तुमचं फिरणं किती होतं?''

''अरे, माझं ऑफिसच माझ्या घरापासून १६ किलोमीटर आहे. रोजचे पस्तीस-चाळीस किलोमीटर तर नक्कीच होतात.''

''आणि हे सगळं कारनं... तुम्ही एकटेच ये-जा करता?''



''हो, नाही तर काय बसला लटकत जाऊ म्हणतोस?'' काका चिडून म्हणाले.

''काका, तुम्ही काही झाडं लावली आहेत का?''

''पावडेकाकूंनी कुंडीतल्या रोपांकरिता माती मागितली तर ती आणून देणं होत नाही काकांना, ते झाडं काय लावणार?'' स्नेहलनं एकदम स्ट्रेट ड्राईव्ह लगावला. सुमितनं पावडेकाकांची आणखी काही माहिती घेतली आणि ॲपवर भरली. पुन्हा निळा तुकडा चमकला आणि काही क्षणांतच त्या निळ्या तुकड्यावर पावडेकाकांची पावलं उमटली.

दोन काळीकुट्ट पाऊलचिन्हे!!

आणि खाली शब्द आले

'सॉरी, यू हॅव डर्टीएस्ट फूटप्रिन्टस. परफेक्ट ब्लॅक फूटप्रिन्टस.' पावडेकाकांचा चेहरा एकदम पडला. ''काय नाटक आहे हे? असल्या व्हर्च्युअल गोष्टी नका सांगू मला'', पावडेकाका रागाने म्हणाले. सुमितनं त्यांच्या नाराज चेहऱ्याकडं पाहिलं आणि तो समजावणीच्या सुरात म्हणाला, ''माफ करा, काका; पण ही पावलं व्हर्च्युअल नाहीत, उलटपक्षी ती अधिक खरीखुरी आहेत. काका, हे ॲप आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण किती कार्बन वातावरणात सोडतो, हे मोजतं. थोडक्यात आपल्या जीवनशैलीतून उमटणाऱ्या आपल्या कार्बन प्रिन्टस रेखाटतं. त्या आपल्याला उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत. आता तुम्ही वीस कि. मी. अंतर तुमच्या कारनं येता, तेव्हा तुम्ही किमान एक लीटर पेट्रोल जाळता म्हणजेच त्याच्या दुपटीहून अधिक कार्बन डायॉक्साईड वातावरणात सोडता!''

''काहीतरीच! मला नाही पटत,'' काका म्हणाले.

''काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत'', सुमित बोलत होता. ''बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत'', स्नेहल गहिवरून म्हणाली.

अभिषेक भारावून म्हणाला, ''माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार. ठरलं एकदम!''

''खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट'', अभिषेकचे बाबा म्हणाले.

रेखामावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.

''पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी'', सुमित म्हणाला.

''पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजतेने नाही बरं पुसता येणार. त्या करता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील,'' सुमित भरभरून बोलत होता. ''हो ना, नाही तर आपण तसेच धावत राहू. मळलेल्या पायांची माणसं बनून!'' पावडेकाका बोलले आणि त्या निळ्याशार तुकड्यावर चांदणं उमलल्याचा त्यांना भास झाला.

(जादू की झप्पी)

**शब्दार्थ :**

**समदा** – सर्व. **भोक्ता** – आवड असणारा. **बक्कळ** – पुष्कळ. **अनाठायी** – अयोग्य ठिकाणी. **टेक्नोसॅव्ही** – तंत्रस्नेही **निरभ्र** – ढग नसलेले. **वर्ख** – अतिशय पातळ पत्रा. **उत्सर्जन** – बाहेर टाकणे. **अवघं** – संपूर्ण, सगळं. **मळमळ व्यक्त करणे** – नाराजी व्यक्त करणे.

## कृती

**(१) आकृती पूर्ण करा.**

(अ) रेखामावशींच्या पावलांची वैशिष्ट्ये

(आ) पावडेकाकांच्या पावलांची वैशिष्ट्ये

**(२) कारणे लिहा.**

(अ) स्नेहल त्रासली, कारण..............

(आ) पावडेकाकांचा चेहरा पडला, कारण..............

(इ) रेखामावशीची पावलं अधिक सुंदर आहेत, कारण..............

(ई) अभिषेकचे बाबा म्हणतात, पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट, कारण ..............

**(३) उत्तर लिहा.**

(अ) स्नेहलने केलेला निश्चय–

(आ) अभिषेकने केलेला निश्चय–

**(४) पाठातील पात्रांची स्वभाव वैशिष्ट्ये लिहून तक्ता पूर्ण करा.**

| व्यक्ती | अभिषेक | सुमित | स्नेहल | पावडेकाका | रेखामावशी |
|---|---|---|---|---|---|
| स्वभाव वैशिष्ट्ये | | | | | |

**(५) खालील वाक्यांतील अलंकार ओळखा.**

(अ) रेखामावशीचे पाय झऱ्याच्या स्फटिक स्वच्छ पाण्यासारखे.

(आ) पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा.

**(६) खालील शब्दांचे प्रचलित मराठीत अर्थ लिहा.**

(अ) व्हर्च्युअल रिॲलिटी

(आ) टेक्नोसॅव्ही

**(७) खालील वाक्यातील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.**

"मावशी, तुम्ही राहता कुठं?"

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| | |

**(८) खालील शब्दांच्या जाती ओळखून लिहा.**

(१) स्नेहल [ ] (२) तिचे [ ] (३) चंदेरी [ ] (४) करणे [ ]

**(९) खालील तक्ता पूर्ण करा.**

| एकवचन | शहर | नदी | पाऊल | डोंगर |
|---|---|---|---|---|
| अनेकवचन | | | | |

**(१०) स्वमत.**

(अ) 'आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे, आपल्याला सहजतेने पुसता येत नाहीत', या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) 'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.

**उपक्रम :**

(अ) आठवड्यातून एक दिवस सायकलचा किंवा सार्वजनिक वाहनाचा वापर करा.

(आ) 'ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम', या विषयावर शिक्षकांच्या मदतीने चर्चा करा.

## भाषाभ्यास



- **वाक्य म्हणजे काय, हे आपण अभ्यासले आहे. वाक्यांचे विविध प्रकार आहेत. त्यांतील काही वाक्यप्रकारांची माहिती आपण करून घेणार आहोत.**

**(१) विधानार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) माझे घर दवाखान्याजवळ आहे.

(आ) तो रोज व्यायाम करत नाही.

या प्रकारच्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते.

**(२) प्रश्नार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) तुला लाडू आवडतो का ?

(आ) तुम्ही सकाळी केव्हा उठता ?

या प्रकारच्या वाक्यांत प्रश्न विचारलेला असतो.

**(३) उद्गारार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) अरेरे ! फार वाईट झाले.

(आ) शाबास ! चांगले काम केलेस.

या प्रकारच्या वाक्यांत भावनेचा उद्गार काढलेला असतो.

**(४) आज्ञार्थी वाक्य**

ही वाक्ये वाचा.

(अ) मुलांनो, रांगेत चला.

(आ) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

या प्रकारच्या वाक्यांत आज्ञा किंवा आदेश असतो.

- **वर दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

❖ ❖ ❖

9Y4GKE

# ८. ऊर्जाशक्तीचा जागर

**डॉ. रघुनाथ माशेलकर** (१९४३) :

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ वैज्ञानिक. ग्लोबल रिसर्च अलायन्सचे अध्यक्ष, रॉयल सोसायटी लंडनचे फेलो. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन संस्थेचे (सीएसआयआर) अध्यक्ष या नात्याने संस्थेच्या कार्याची व्याप्ती वाढवण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. पद्मविभूषण या पुरस्काराने सन्मानित. त्यांची 'शोध नव्या भारताचा', 'पंचशील : नव्या युगाचे', 'टाईमलेस इन्स्पिरेटर', 'तिलक इन अवर टाइम्स', 'रिइन्व्हेंटिंग इंडिया' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. भारतातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी बौद्धिक क्षमतेच्या आधारे ज्ञानाचे अर्थपूर्ण नियोजन करणारे डॉ. रघुनाथ माशेलकर आघाडीचे भारतीय शास्त्रज्ञ आहेत. प्रचंड कष्ट करण्याची वृत्ती, सकारात्मकता, शिस्त, संशोधक वृत्ती, नेतृत्त्वगुण व प्रखर देशनिष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय पैलू आहेत.

प्रस्तुत पाठात लेखकाने त्यांच्या विद्यार्थी दशेतील आठवणी सांगितल्या आहेत. लहानपणीच पित्याचे छत्र हरपलेल्या माशेलकरांना त्यांच्या आईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीने शिक्षण घेण्यास कसे प्रवृत्त केले, याचे वर्णन या पाठात आले आहे.

शाळा आणि शिक्षक असा विषय निघाला, की मला माझी मुंबईतील शाळा आणि शालेय जीवनातील शिक्षकांची आठवण येते. गिरगावातील युनियन हायस्कूल आणि माझ्या शाळकरी वयात आपुलकीनं संस्कार करणारे भावे सर, जोशी सर, शिर्के सर या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे; पण त्याचवेळी हेही सांगितलं पाहिजे, की या शाळेशी आणि या संस्कार देणाऱ्या शिक्षकांशी माझा जो संपर्क आला, तो जिच्यामुळे आला ती माझी परमप्रिय आई आणि माझे मामा यांचे ऋण मी कसे व्यक्त करणार? आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते. माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती, तर माझे सर्वस्व होती.

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहात होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला अनवाणीच राहावं लागलं.

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याची वेळ आली त्यावेळी तर आणखी एक मोठं संकट समोर आलं. त्यावेळची हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रुपये होती; पण आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार? प्रवेश फी भरणे शक्य नसल्यामुळे आता माझे शिक्षण थांबणार असे वाटू लागले; पण माझ्या आईने धीर सोडला नाही. आजूबाजूच्या बिऱ्हाडांतील काही कामे करून तिने पैसे जमवण्यास सुरुवात केली. त्याच वेळी तिच्या परिचयातील एक माऊली मदतीला धावली आणि माझ्या प्रवेश फीची व्यवस्था झाली; पण तोपर्यंत गिरगावातील त्यावेळच्या नामांकित शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.

अखेर युनियन हायस्कूलमध्ये मला प्रवेश मिळाला आणि माध्यमिक शिक्षणाचा पुढील टप्पा सुरू झाला. अनेक अडीअडचणींमधून मी जमेल तेवढा अभ्यास करत होतोच; पण त्या छोट्याशा खोलीतील जागा अपुरी पडायची.

अभ्यासाला पूरक वातावरण नव्हते. मात्र त्याही वातावरणात मी जिद्दीने अभ्यास करत राहिलो आणि परीक्षेत चांगलं यश मिळत गेलं. या युनियन हायस्कूलमधले शिक्षक, त्यांची सेवाभावी वृत्ती, विद्यार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये त्यांचे स्वत:ला झोकून देणे आणि निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या केवळ शालेय अभ्यासाचाच पाया पक्का झाला असं नाही, तर आयुष्याचाच पाया पक्का झाला. शिक्षणाबद्दल एक आंतरिक ओढ वाटू लागली.

आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. काँग्रेस हाऊसजवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.'

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

याच हायस्कूलमध्ये मला भावे सर भेटले. ते आम्हांला भौतिकशास्त्र शिकवत. विज्ञानातील हा विषय शिकवताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही, तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्त्वज्ञान शिकवलं.




एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, ''माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल.'' एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे, प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे 'माझे संस्कार केंद्र' डोळ्यांसमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

(आठवणीतील शाळा आणि शिक्षक)

**शब्दार्थ :**

**आसुसणे** – एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा बाळगणे. **अनवाणी** – पायात चप्पल न घालता. **निरपेक्ष** – अपेक्षारहित. **ऋण असणे** – उपकार असणे. **झोकून देणे** – पूर्णपणे सहभागी होणे.

## कृती

**(१) खालील तक्त्यात माहिती भरून तो पूर्ण करा.**

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| लेखकाची माध्यमिक शाळा | लेखकाला घडवणारे शिक्षक | लेखकाचे जन्मगाव | ऋण व्यक्त न करता येणाऱ्या व्यक्ती | मुंबईतील घराचे नाव |
| | | | | |

**(२) आकृती पूर्ण करा.**

(अ) युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्ट्ये

(आ) लेखकाच्या आईचे व्यक्तिमत्त्व विशेष

**(३) कारणे लिहा.**

(अ) लेखकाला शिक्षणाबद्‌दल आंतरिक ओढ निर्माण झाली, कारण..............

(आ) लेखकाच्या आईला काँग्रेस हाऊसमध्ये काम मिळाले नाही, कारण..............

(इ) लेखकाला गिरगावातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळाला नाही, कारण..............

**(४) कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून रिकाम्या जागेत भरा.**

(अ) आपण सगळ्यांनी ............. मदत केली पाहिजे. (आई)

(आ) आमच्या बाईंनी प्रमुख ............. आभार मानले. (पाहुणे)

(इ) शिक्षण पूर्ण झाल्यावर मोहन सरकारी ............. रुजू झाला. (नोकरी)

**(५) 'पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात.'**

प्रस्तुत वाक्यातील अलंकार (१) [ ]

(१) उपमेय [ ] (२) उपमान [ ]

**(६) स्वमत.**

(अ) 'भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा', या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(आ) शालेय विद्यार्थ्यांच्या भूमिकेतील डॉ. माशेलकर यांचे तुम्हांला जाणवलेले गुणविशेष सोदाहरण लिहा.

(इ) डॉ. माशेलकर यांची मातृभक्ती ज्या प्रसंगातून ठळकपणे जाणवते, ते प्रसंग पाठाधारे लिहा.

(ई) 'माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान', या विषयावर तुमचे विचार लिहा.

9YDCM2

## ❖ जाता अस्ताला (स्थूलवाचन)

**गुरुदेव रवींद्रनाथ टागोर** (१८६१ ते १९४१) :

विश्वविख्यात बंगाली महाकवी. कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चित्रकार, शिक्षणतज्ज्ञ आणि मानवतावादी विचारवंत. स्वतंत्र भारताच्या राष्ट्रगीताचे रचनाकार. जागतिक कीर्तीच्या नोबेल पुरस्काराचे भारतच नव्हे तर आशियातील पहिले विजेते. त्यांचे लेखन अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. 'शांतिनिकेतन' आणि 'विश्वभारती' या त्यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक संस्थांनी जगभरात कीर्ती मिळवली. रवींद्र संगीत ही त्यांनी भारतीय संगीताला दिलेली मौल्यवान भेट आहे. त्यांचे 'कविकाहिली', 'संध्यासंगीत', 'प्रभातसंगीत', 'जीवनस्मृति', 'छेलेबेला' नोबेल पुरस्कार विजेता 'गीतांजली' यांसारखे काव्यसंग्रह; 'विसर्जन', 'नौकाडुबी', 'गोरा', 'चतुरंग' आदी कादंबऱ्या; 'वनफूल', 'शैशवसंगीत' ही खंडकाव्ये; 'राजा', 'डाकघर' इत्यादी नाटके यांसारखे विपुल लेखन प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत बंगाली कवितेचे मराठीत स्वैर रूपांतर श्यामला कुलकर्णी यांनी केले आहे. या कवितेत महाकवी टागोर यांनी सूर्य आणि पणतीच्या प्रतीकांद्वारे अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सांगितले आहे.

केलै वै मौर कार्य
कहै संध्या रवि
सुनिया जगत रहे निरुत्तर
माटिर प्रद्वीप छिले
छे कहिल स्वामी
आमार हे टकू
करिब ता अभि

**– गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

### जाता अस्ताला

जाता अस्ताला सूर्याचे
डोळे पाणावले
जाईन मी जर या विश्वाचे
होईल कैसे भले
अंधारामध्ये बुडून जाईल
लगेच सारी धरा
कुणी वाचवा या पृथ्वीला
करा करा हो त्वरा
कुणी न उठती
ये ना पुढती
कुणास ना शाश्वती
इकडे तिकडे बघत हळूचि
पणती ये पुढती
विनम्र भावे लवून म्हणे ती
तेजोमय भास्करा
मम तेजाने जमेल तैसी
उजळून टाकीन धरा
वच हे ऐकुनि त्या तेजाचे
डोळे ओलावले
तृप्त मनाने आणि रवि तो
झुकला अस्ताकडे

**– श्यामला कुलकर्णी**

## कृती

(१) तुम्हांला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

(२) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

(३) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या भावभावना शब्दबद्ध करा.

(४) कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

- सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.





सूर्य : ..............................................................................

पणती : ..............................................................................

सूर्य : ..............................................................................

पणती : ..............................................................................

सूर्य : ..............................................................................

पणती : ..............................................................................

सूर्य : ..............................................................................

पणती : ..............................................................................

सूर्य : ..............................................................................

पणती : ..............................................................................

❖ ❖ ❖

# ९. औक्षण

भाग ३

**इंदिरा संत** (१९१४ ते २०००) :

सुप्रसिद्ध कवयित्री, कथाकार, ललित लेखिका. विशुद्ध भावकविता लिहिणारी कवयित्री म्हणून तत्कालीन समीक्षकांनी इंदिरा बाईंच्या कवितेला मुक्त दाद दिली. प्रीती, विरह, एकाकीपणाचे दु:ख आणि भावनांचा कल्लोळ निसर्गप्रतिमांतून भावोत्कटतेने आणि नेमक्या शब्दांमधून अभिव्यक्त करण्याची शैली हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य होय. त्यांचे 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'गर्भरेशीम', 'चित्कळा', 'वंशकुसुम' आणि 'निराकार' हे कवितासंग्रह; 'श्यामली', 'कदली', 'चैतु' हे कथासंग्रह असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. त्यांच्या 'गर्भरेशीम' या संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे.

सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाला साऱ्या देशवासीयांकडून केले जाणारे हे औक्षण आहे. औक्षण करताना मनात येणाऱ्या विविध भावनांचे वर्णन कवयित्रीने प्रस्तुत कवितेतून व्यक्त केले आहे.

नाही मुठीमधे द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;

जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;

वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;

तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी

अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.



(इंदिरा संत यांची समग्र कविता)

**शब्दार्थ :**

**औक्षण** – ओवाळणे. **द्रव्य** – धन, पैसा, संपत्ती. **बंबारा** –बंदुकीच्या गोळ्यांचा/तोफगोळ्यांचा भडिमार. **कल्लोळ** – लोळ. **पाजळणे** – पेटवणे, चेतवणे.

## कृती

**(१) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?

(आ) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?

(इ) डोळे भरून पाहावे असे दृश्य कोणते?

**(२) योग्य पर्याय निवडा.**

(अ) सैनिकाचे औक्षण केले जाते.....

(१) भरलेल्या डोळ्यांनी/भरलेल्या अंत:करणाने

(२) डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी

(३) तबकातील निरांजनाने

(४) भाकरीच्या तुकड्याने

(आ) कवितेतील 'दीनदुबळे' म्हणजे .....

(१) कष्टाचे, पैसे नसलेले.

(२) सैनिकाबरोबर लढणारे.

(३) शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले.

(४) सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.

**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.'

(आ) 'सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा.

(इ) कवितेच्या संदर्भात 'दीनदुबळे' याचा कवयित्रीला अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करा.

(ई) 'देशसेवा हीच ईश्वरसेवा' असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकांसाठी तुम्हांला काय करावेसे वाटते ते लिहा.

**उपक्रम :**

(१) सैनिकाची मुलाखत घेण्यासाठी दहा प्रश्न तयार करा.

(२) एखाद्या माजी सैनिकाची मुलाखत घेऊन त्याचे अनुभव जाणून घ्या.

(३) 'सैनिक' या विषयावरील गीतांचे संकलन करून त्यांचा संग्रह करा.

## भाषाभ्यास

रस म्हणजे चव किंवा रुची. आपण गोड, कडू, आंबट, तिखट, तुरट, खारट अशा सहा प्रकारच्या चवी अनुभवतो. त्याचप्रमाणे काव्याचा आस्वाद घेताना वेगवेगळे रस आपण अनुभवतो. त्यातील भावनांमुळे साधारणपणे नऊ प्रकारचे रस आपल्याला दैनंदिन जीवनात आणि साहित्यात अनुभवायला मिळतात.

| | |
|---|---|
| **करुण** | शोक, दुःख, वियोग, दैन्य, क्लेशदायक घटना. |
| **शृंगार** | स्त्री-पुरुषांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आकर्षणाचे, प्रेमाचे, भेटीची तळमळ, विरह, व्याकुळ मन. |
| **वीर** | पराक्रम, शौर्य, धाडस, लढाऊ वृत्ती. |
| **हास्य** | विसंगती, विडंबन, असंबद्ध घटना, चेष्टा-मस्करी. |
| **रौद्र** | क्रोधाची तीव्र भावना, निसर्गाचे प्रलयकारी रूप. |
| **भयानक** | भयानक वर्णने, भीतिदायक वर्णने, मृत्यू, भूतप्रेत, स्मशान, हत्या. |
| **बीभत्स** | किळस, तिरस्कार जागृत करणाऱ्या भावना. |
| **अद्भुत** | अद्भुतरम्य, विस्मयजनक, आश्चर्यकारक भावना. |
| **शांत** | भक्तिभाव व शांत स्वरूपातील निसर्गाचे वर्णन. |

रस ही संकल्पना संस्कृत साहित्यातून आलेली आहे. ती शिकवताना प्रामुख्याने कवितांची उदाहरणे दिली जातात. याचा अर्थ रस फक्त काव्यातच असतो असे नाही तर तो सर्व प्रकारच्या साहित्यात असतो. तसेच कधी कधी या नऊ रसांव्यतिरिक्त अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भावभावनाही असू शकतात. कोणत्याही साहित्यामध्ये एक किंवा अधिक रस असू शकतात. कवितेतील रस हा विशिष्ट शब्दांत नसतो. उदाहरणार्थ, कवितेत 'वीर' हा शब्द आला म्हणजे त्या कवितेत वीररस असेलच असे नाही. तसेच 'हुंदका' शब्द आला म्हणजे तिथे करुण रस असेलच असे नाही.

❖ ❖ ❖

9YH8NP

# १०. रंग साहित्याचे

आपले विचार, भावभावना योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील, तर भाषेवर प्रभुत्व हवे. मराठी भाषा विविध साहित्यप्रकारांनी समृद्ध आहे. या साहित्याच्या वाचनाने भाषेवर प्रभुत्व येते आणि जीवनानुभवही समृद्ध होतो.

प्रस्तुत पाठातून विविध साहित्यप्रकारांचा परिचय करून देण्यात आला आहे. या साहित्यप्रकारांशी मैत्री केली, तर मनोरंजनाबरोबर आपले ज्ञानही वाढेल असा संदेशही दिला आहे. नाट्यस्वरूपातील हा पाठ साहित्यातील विविध कलाकृतींचा परिचय करून देणारा आहे.



सुश्रुतच्या वर्गाची सहल भिलार या पुस्तकांच्या गावाला नेण्याचे ठरले. वर्गात सूचना आली. दुसऱ्या दिवशी शिक्षकांनी भिलार या गावाची माहिती सांगितली. त्याबाबत एक फिल्म दाखवली. सुश्रुतला ते खूप आवडले. घरी परतल्यावर तो सहलीला जाणार म्हणून आनंदाने झोपला.

काही वेळाने त्याला जाणवले, की काही पुस्तके मुलामुलींचा वेश करून आणि हातात हात घालून आनंदाने गाणी गात आहेत, नाचत आहेत. एवढंच नाही तर त्याला उठवतही आहेत. सुश्रुत झोपेतच म्हणाला ''कोण रे तुम्ही, इथे काय करत आहात?'' पुस्तकाच्या वेशातील मुले सुश्रुतला म्हणाली, ''अरे आम्ही सर्व तुला भेटायला आलो आहोत. आम्हांला तुझ्याशी मैत्री करायची आहे.''

**सुश्रुत** : तुम्ही सगळे कोण आहात?

**कथा** : अरे, असा घाबरतोस काय? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळ्यांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे, मी आहे कथा. गोष्ट हे माझंच दुसरं नाव.

**सुश्रुत** : आपली ओळख कशी काय?

**कथा** : आईच्या, आजीच्या तोंडून इसापनीती, पंचतंत्र, अकबर-बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना!

**सुश्रुत** : होऽऽ आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा, उंदीर, ससा-कासव यांच्या गोष्टी सांगायची.

**कथा** : बरं का सुश्रुत! आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये.

**सुश्रुत** : तुझे काही प्रकार असतात का? कारण आज मराठीच्या मॅडम म्हणाल्या, ''आपण 'साहस कथा' शिकूया.''

**कथा** : अगदी बरोबर! परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा हे माझेच अनेक प्रकार आहेत. शिवाय नाटक, मालिका, चित्रपट या सर्व ललितकलांचा पाया म्हणजे मी. मूळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाही. एवढंच नाही तर उत्तम निवेदन तंत्रामुळे मी खुलत जाते, रंगत जाते किंबहुना उत्तम निवेदनतंत्राचा वापर हे माझ्या यशाचं रहस्य.

**सुश्रुत** : तुला निर्माण करणाऱ्या लेखकांची नावं मला सांग ना-

**कथा** : य. गो. जोशी, वि. स. खांडेकर, विभावरी शिरूरकर, व्यंकटेश माडगूळकर, व. पु. काळे, शंकर पाटील, अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल, द. मा. मिरासदार यांसारख्या अनेक नामवंत लेखकांनी आपल्या उत्तमोत्तम कथांनी मराठी वाचकांना तृप्त केलंय.

**सुश्रुत** : कित्ती सुंदर! आता ही ताई कोण बरं?

**कादंबरी** : काय सुश्रुत, आवडली का कथा? मी कादंबरी. कथेची थोरली बहीणच म्हण हवं तर. कादंबरी म्हणजे खरं तर मोठी कथाच; पण माझा आवाका कथेपेक्षा फार मोठा!

**सुश्रुत** : मोठ्ठा म्हणजे किती गं?

**कादंबरी** : अरे, माझ्यात खूप खूप पात्रं असतात. त्यांचा परस्पर संबंध असतो. विविध घटना, प्रसंगांतून माझे कथानक हळूहळू उलगडत जाते. वाचता वाचता माझ्यातील पात्रं तुम्हांला ओळखीची वाटू लागतात, आपल्यातीलच भासू लागतात. अनेक अनपेक्षित वळणं घेत घेत मी वाचकांची उत्कंठा वाढवते. आता या कथानकात पुढे काय होईल? याचा विचार करत वाचक माझ्यात गुंतून जातो व रममाण होतो.

**सुश्रुत** : खरंच, तुझा आवाका खूपच मोठा आहे.

**कादंबरी** : बरं का सुश्रुत, साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' या कादंबरीला मिळाला. तेव्हा मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरून आला.
(इतक्यात कविता सुश्रुतच्या खांद्याला धरून विचारते.)

**कविता** : सुश्रुत, ओळखलंस मला? अरे, मी आहे कविता. आपली तर फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे, नाही का? तुमच्या पाठ्यपुस्तकांतल्या सगळ्या कविता तुम्ही तालासुरांत म्हणता.

**सुश्रुत** : हो ताई! मला आठवतंय. 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' आणि 'श्रावणमासी हर्ष मानसी' या माझ्या आवडत्या कविता.

**कविता** : छान हं. सुश्रुत, माझं रूप छोटंसं, आटोपशीर. मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणं हे माझं वैशिष्ट्य. यमक, अनुप्रास अशा शब्दालंकारांनी माझं बाह्यरूप आणि उपमा, उत्प्रेक्षा, रूपकासारख्या अर्थालंकारांनी माझं अंतरंग सजवून कवी मला अधिक आशयगर्भ करतात.

**सुश्रुत** : मॅडम नेहमी सांगतात कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते. कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना?

**कविता** : अगदी बरोबर! आणखी काय माहीत आहे सुश्रुत तुला?

**सुश्रुत** : ताई, मला असं वाटतं संगीतकारांनी स्वरसाज चढवला, की तुझं गाण्यात रूपांतर होतं, कारण तुला मी पाठ्यपुस्तकात वाचतो आणि सीडीमध्ये, चित्रपटात ऐकतोसुद्धा.

**कविता** : छान निरीक्षण आहे हं तुझं. बरं, मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?

**सुश्रुत** : हो, करतात ना.

**कविता** : कोणत्या तारखेला करतात?

**सुश्रुत** : अंऽऽऽ, २७ फेब्रुवारीला.

**कविता** : अगदी बरोबर. तो कोणाचा जन्मदिवस आहे, माहीत आहे तुला?

**सुश्रुत** : नाही ग.

**कविता** : 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा.

**सुश्रुत** : खरंच?

**कविता** : कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत, बालकवी, बा. भ. बोरकर, बा. सी. मर्ढेकर, शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले.

संतकाव्यापासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.

नाटक : अरे सुश्रुत, ओळखलंस का मला ?

सुश्रुत : तू कोण आहेस रे ?

नाटक : माझ्याकडे बघ म्हणजे तुला कळेल.

सुश्रुत : अरे, नाटकदादा तूऽऽ

नाटक : पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी मराठी माणसाच्या ह्रदयात अढळ स्थान प्राप्त करतो. तुला माहीत आहे, माझं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो. वाचनीय अन् प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.

सुश्रुत : मी कालच एक धमाल बालनाट्य बघितलं. त्याचं दिग्दर्शन उत्तम होतं, असे बाबा म्हणाले.

नाटक : वाऽऽ छान! अरे, दिग्दर्शकासाठी मला दिग्दर्शित करणे हा आनंददायी अनुभव असतो. मराठी भाषेत गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, राम गणेश गडकरी, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर, प्र. के. अत्रे अशा दिग्गज लेखकांनी मला समर्थपणं हाताळलं.

चरित्र : ए, सुश्रुत, शुक् शुक् इकडे बघ.

सुश्रुत : कोण बोलवतंय मला ?

चरित्र : अरे मी! मी चरित्र. मी एखाद्या थोर व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीचा लेखकावर प्रभाव पाडतो आणि त्याच्या आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते आणि त्यातून मी जन्माला येतो.

सुश्रुत : मॅडम नेहमी म्हणतात, की थोरांची चरित्रं सामान्यांना प्रेरणा देतात म्हणून.

चरित्र : अगदी बरोबर, कारण मी असतोच मुळी संघर्षमय, कर्तृत्ववान आणि संधीचे सुवर्णसंधीत रूपांतर करणारा. म्हणूनच सामान्य लोकांची मनं, मतं माझ्या सहवासात बदलतात. बाबासाहेब पुरंदरे, धनंजय गाडगीळ, भा. द. खेर, रणजित देसाई अशा अनेक प्रसिद्ध लेखकांनी मला हाताळले.

सुश्रुत : वा! सर्व ताई-दादांनी मला कित्ती माहिती दिली. आता हा कोणता दादा बरं ?

आत्मचरित्र : मी आत्मचरित्र. चरित्रांच्याच कुटुंबातील एक. चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचं लेखकानं केलेलं वर्णन, तर मी म्हणजे व्यक्तीने स्वत:च्या जीवनप्रवासाचं तटस्थपणे केलेलं वर्णन. माझ्या आयुष्यात आलेल्या विविध टप्प्यांचे, वळणांचे, भल्याबुऱ्या अनुभवांचे कथन मी तटस्थपणे करतो. त्यातून मी साकारला जातो. स्वातंत्र्यवीर सावरकर, सुनीता देशपांडे, माधवी देसाई, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. प्रकाश आमटे, मल्लिका अमर शेख, दया पवार, विश्राम बेडेकर, लक्ष्मण गायकवाड हे माझे गाजलेले लेखक.

सुश्रुत : अरे, सर्वांत शेवटी तो कोणता दादा उभा आहे ? आणि तो माझ्याशी बोलणार नाही का ?

प्रवासवर्णन : का नाही बोलणार ? जरूर बोलेन. अरे मीच तुला घरी बसून दूरदूरच्या गावी, देशी पोहचवणार ना ?

सुश्रुत : म्हणजे ? आणि ते कसं काय ?

प्रवासवर्णन : माझं ते कार्यच आहे. एखाद्या ठिकाणी प्रवास करून आल्यानंतर प्रवासाची, प्रेक्षणीय ठिकाणांची रोचक, मुद्देसूद आणि जशीच्या तशी माहिती वाचकांपर्यंत मी पोहोचवतो. ही माहिती रटाळ, कंटाळवाणी न होऊ देता रंजक पद्धतीनं मनोवेधक भाषेत मांडणं हे लेखकाचं कसब. लेखक त्या ठिकाणच्या माहितीबरोबरच स्वत:चे अनुभव, भावना, निसर्गसौंदर्य, व्यक्तिविशेष यांचीही सुरेख मांडणी करतो.

सुश्रुत : म्हणजे ना तिकीट, ना व्हिसा, ना बस, ना विमान मी कुठेही जाऊ शकतो. सर्व ठिकाणांना भेट द्यायला तुझ्या माध्यमातून.

**प्रवासवर्णन :** अगदी बरोबर आणि हेच माझं वैशिष्ट्य. म्हणूनच मला गंगाधर गाडगीळ, रा. भि. जोशी, पु. ल. देशपांडे, रमेश मंत्री, मीना प्रभू अशा मोठ्या लेखकांनी आपलंसं करून प्रसिद्ध केलं.

**सुश्रुत :** किती छान आहात तुम्ही सगळेजण! तुमच्याशी मैत्री करायला खूप आवडेल मला. तुमच्यासारख्या नि: स्वार्थी मित्रांमुळे माझं मनोरंजनही होईल, ज्ञानही वाढेल आणि .... त्यामुळे माझे लेखनही सुधारेल.

**सगळे :** आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे आम्ही तुला कधीच सोडून जाणार नाही.

**पुस्तके :** (सगळे गातात)


साहित्याचे रंग विविध हे, भुलविती साऱ्या रसिकजना
इंद्रधनु ते सप्तरंगी जसे, सुशोभित करते गगना
धन्य आमुची माय मराठी, धन्य साहित्यसंपदा
वाचू आनंदे, लिहू नेमाने, वाङ्‌मयरसात न्हाऊ सदा

**शब्दार्थ :**

**उत्कंठा** – उत्सुकता. **रममाण होणे** – मग्न होणे. **भान ठेवणे** – जाणीव ठेवणे.

## कृती

**(१) प्रस्तुत पाठात आलेल्या साहित्य प्रकारांची नावे लिहा.**




**(२) आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ)




(आ)




(इ)





**(३) फरक स्पष्ट करा.**

| चरित्र | आत्मचरित्र |
|---|---|
| | |

**(४) खाली दिलेल्या अनेकवचनी नामांचे एकवचनी रूप लिहून त्यांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.**

(अ) रस्ते (आ) वेळा (इ) भिंती (ई) विहिरी (उ) घड्याळे (ऊ) माणसे

**(५) खालील शब्दांना 'पर' हा एकच शब्द जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार होतात. ते बनवा. मराठी भाषेतील अशा विपुल शब्दसंपत्तीचा अभ्यास करा. त्याप्रमाणे वेगवेगळे शब्द तयार करा.**




उदा.,परप्रांत.

**(६) खालील सामासिक शब्दांचा समास ओळखून तक्ता पूर्ण करा.**

यथामती, प्रतिदिन, आईवडील, चारपाच, त्रिभुवन, केरकचरा, भाजीपाला, चहापाणी, आजन्म, गैरशिस्त, विटीदांडू, पापपुण्य, स्त्रीपुरुष

| द्विगू | अव्ययीभाव समास | वैकल्पिक द्वंद्व समास | इतरेतर द्वंद्व समास | समाहार द्वंद्व समास |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**(७) स्वमत.**

(अ) पुस्तकाशी मैत्री करण्याचे फायदे लिहा.

(आ) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) 'उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

(ई) तुम्हांला आवडलेल्या पुस्तकाबाबत खालील मुद्द्यांचा विचार करून माहिती लिहा.

(१) पुस्तकाचे नाव (२) लेखक (३) साहित्यप्रकार (४) वर्ण्य विषय (५) मध्यवर्ती कल्पना
(६) पुस्तकातून मिळणारा संदेश (७) मूल्य (८) सामाजिक महत्त्व (९) आवडण्याची कारणे

**उपक्रम :**

(१) साहित्यप्रकार व त्यांची वैशिष्ट्ये यांबाबत आंतरजालावरून माहिती मिळवा.

(२) साहित्यप्रकारानुसार अन्य लेखकांची नावे व त्यांच्या साहित्यकृतींची नावे आंतरजालावरून शोधून लिहा.

❖ ❖ ❖

## वाक्यरूपांतर

वाक्यरूपांतराला वाक्यपरिवर्तन असेही म्हणतात. वाक्यरूपांतर म्हणजे वाक्याच्या रूपात किंवा रचनेत केलेला बदल होय. आपण बोलत असताना एकाच स्वरूपाची वाक्ये बोललो तर ऐकणाऱ्याला ती कंटाळवाणी वाटतात. तसेच लेखकांनी एकाच साच्याची वाक्ये लिहिली तर वाचणाऱ्याला कंटाळा येतो. म्हणूनच वाक्यरचनेतील बदल गरजेचा ठरतो.

**वाक्याचे रूपांतर करताना रचनेत बदल होत असला तरी वाक्याच्या अर्थात अजिबात बदल होता कामा नये.**

यावर्षी आपल्याला (१) प्रश्नार्थक (२) विधानार्थी (३) उद्‍गारार्थी (४) आज्ञार्थी (५) होकारार्थी (६) नकारार्थी वाक्यांचे वाक्यरूपांतर शिकायचे आहे.

### (अ) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(१) जगात सर्व सुखी असा कोण आहे? (प्रश्नार्थक)
जगात सर्व सुखी असा कोणी नाही. (विधानार्थी)

वरील उदाहरणात होकारार्थी प्रश्नाचे रूपांतर मात्र विधानार्थी रूपांतर नकारार्थी झाले आहे.

(२) अपमान केल्यास कुणाला राग येत नाही? (नकारार्थी प्रश्न)
अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतो. (होकारार्थी)

वरील उदाहरणात नकारार्थी प्रश्नाचे रूपांतर मात्र होकारार्थी विधानात झाले आहे.

**या दोन्ही उदाहरणात जे प्रश्न विचारले आहेत ते उत्तराच्या अपेक्षेने विचारलेले प्रश्न नाहीत. अशा प्रकारच्या प्रश्नांमध्येच त्यांचे उत्तर दडलेले असते. अशा प्रश्नार्थक वाक्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करताना लक्षात ठेवावे, की**

(१) प्रश्न होकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य नकारार्थी करावे.
(२) प्रश्न नकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य होकारार्थी करावे.

### (आ) उद्‍गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(१) केवढी उंच इमारत ही! (उद्‍गारार्थी)
ही इमारत खूप उंच आहे. (विधानार्थी)

(२) किती पाऊस पडला हो काल रात्री!
काल रात्री खूप पाऊस पडला.

उद्‍गारार्थी वाक्ये अधिक परिणामकारक वाटतात कारण एखाद्या गोष्टीतील आधिक्य, परिणाम, मोठी संख्या, विपुलता परिणामकारक रीतीने व्यक्त केलेली असते. विधानार्थी वाक्यांत कोणत्या गोष्टीची विपुलता स्पष्ट करायची आहे ते स्पष्ट करावे. त्यासाठी खूप, प्रचंड, भरपूर यांसारखे शब्द वापरले जातात.

### (इ) आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

उदा., तू चित्र काढ. (आज्ञार्थी)     तू चित्र काढावे. (विधानार्थी)

आज्ञार्थी वाक्यांत आज्ञा अभिप्रेत असते. विधानार्थी वाक्यांत सरळ विधान अभिप्रेत असते. या परस्पर वाक्यांचे वाक्यरूपांतर करताना भावार्थ लक्षात घ्यावा.

### (ई) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(१) पाचशे रुपये ही देखील मोठी रक्कम आहे. (होकारार्थी)
पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नाही. (नकारार्थी)

(२) ही काही वाईट कल्पना नाही. (नकारार्थी)
ही कल्पना चांगली आहे. (होकारार्थी)

वरील उदाहरणांमध्ये 'मोठी' विरूद्ध 'लहान' आणि 'वाईट' विरूद्ध 'चांगली' असे शब्द वापरल्यामुळे वाक्याचा मूळ अर्थ बदलत नाही.

# ११. जंगल डायरी

**अतुल धामनकर** (१९७२) :

प्रसिद्ध वन्यजीव संशोधक, लेखक आणि छायाचित्रकार. त्यांनी गेल्या पंचवीस वर्षांपासून ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प (टीएटीआर) मध्ये वाघांचा अभ्यास केलेला आहे. राजस्थान, पश्चिम बंगाल, उत्तराखंड आणि गुजरात मधील अनेक उत्कृष्ट जंगलांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यांची 'वाघ', 'मृगकथा', 'नवरंगाचं घरटं', 'अरण्याचे अंतरंग', 'महाराष्ट्रातील वन्यजीवन', 'ताडोबा वाघांचे जंगल', 'जंगलाची डायरी', 'मार्जारकथा' ही वन्यजीवनविषयक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत पाठात लेखकाने जंगलाच्या डायरीतील काही अनुभव सांगताना जंगलातील प्राण्यांचे निरीक्षण करताना आलेल्या चित्तथरारक प्रसंगांचे वर्णन केले आहे. तसेच वाघिणीमध्ये दडलेल्या 'मातृत्वाचे' रोमहर्षक वर्णन आलेले आहे.

ता.२७ मे १९९७, वेळ-सकाळी ६ ते ९.३०, कोळसा परिक्षेत्र, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

आज पहाटेच कोळसावन विश्रामगृहातून बाहेर पडलो.

गावातून टोंगे वनरक्षक आणि त्यांचा सहकारी वनमजूर येताना दिसले. वनरक्षक येताच आम्ही डावीकडं जाणारा झरी रस्ता धरला. समोर चालणारा वनमजूर अचानक थबकला. मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं, तर त्यानं रस्त्याकडं बोट रोखलं. नुकत्याच गेलेल्या एका मोठ्या बिबळ्याची ताजी पावलं तिथं उमटली होती. हा एक नर असून आम्ही पोहोचण्याच्या तासाभराआधीच इथून गेला असावा. मी चौफेर पाहिलं; पण मला तरी काही दिसलं नाही.

अचानक मला जंगलाच्या कोपऱ्यावर थोडीशी हालचाल जाणवली. मी सगळ्यांना हातानंच थांबायची खूण केली. दुर्बीण डोळ्यांना लावल्यावर ती हालचाल स्पष्ट झाली. तिथं एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता; पण त्याचा रंग आसपासच्या परिसराशी एवढा मिसळून गेला होता, की त्याची शेपूट जर हलली नसती, तर तो मला मुळीच दिसला नसता. त्याची पाठ आमच्याकडं होती, त्यामुळे त्यानं अद्याप आम्हांला पाहिलं नव्हतं; पण तेवढ्यात टोंगे वनरक्षकांचा पाय एका वाळक्या काटकीवर पडला आणि 'कट्' असा आवाज झाला. तिखट कानांच्या बिबळ्यानं तो आवाज ऐकताच वळून पाहिलं आणि एकाच झेपेत तो जंगलात अदृश्य झाला.

बिबळ्याच्या निरीक्षणांची चांगली संधी हातची गेली म्हणून मी हळहळलो. टोंगे यांना शरमिंदं झाल्यासारखं वाटलं. आम्ही लगेच पुढं निघालो. थोड्याच अंतरावर रायबाकडं जाणारा रस्ता उजवीकडं वळत होता. तो रस्ता धरला आणि जंगल आणखीच दाट झाल्यासारखं वाटलं. इथं दोन-तीन नाले असल्यानं झुडपांची दाटी जास्तच जाणवते. तसंच त्या नाल्यांमध्ये थोडं पाणी साचून राहात असल्यानं तिथं कुठलाही वन्यप्राणी दिसण्याची शक्यता होती. त्यामुळं आता सावधपणे पावलं टाकणं आवश्यक होतं.

कालच संध्याकाळी विश्रामगृहावर गप्पा मारताना टोंगेंनी मला त्या परिसरात चार पिल्लं असलेल्या वाघिणीबद्दल सांगितलं होतं. तेव्हापासूनच मला कधी तिथं जातो असं झालं होतं. प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याच्या आसपासच वावरतं. तशातच लहान पिल्लं असल्यानं या वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; पण लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही. त्यामुळं सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक अनामिक दडपण आलं होतं.



दहा-बारा पावलंच चाललो असू. मला नाल्यातील ओलसर चिखलात मांजरापेक्षा मोठ्या

आकाराची अनेक पावलं उमटलेली दिसली. मी झटकन पुढं जाऊन वाकून बघितलं. या पिल्लांच्याच पाऊलखुणा होत्या. त्या पगमार्क्सकडं बघून लक्षात आलं, की ते काल रात्रीचेच आहेत. याचा अर्थ स्पष्ट होता. वाघीण अद्याप आपल्या पिल्लांसह याच परिसरात वावरत होती. आता मी ती पिल्लं बघायला चांगलाच अधीर झालो होतो. इथून सुमारे शंभर-सव्वाशे पावलांवर नाल्यात थोडंसं पाणी असल्याचं मला माहीतच होतं. ही वाघीण तिथंच सापडण्याची शक्यता होती. त्यामुळं आता तिकडं जाताना खूपच सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं. जमिनीवर सर्वत्र पानगळीमुळं पडलेला वाळका पाचोळा साचून होता. त्यावरून पाय न वाजवता जाणं ही एक मोठीच कसरत होती.

पाणवठा जसा जवळ आला तसं माझं हृदय जोरजोरात धडधडू लागलं. पुढं काय दिसेल, या जाणिवेनंच माझा घसा कोरडा पडला. इतरांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आम्ही सगळ्यांनीच एकमेकांकडं बघत चौकस राहण्याची डोळ्यांनीच खूण करून सूचना केली. आता एकेक पाऊल टाकताना मनावरचं दडपण अधिकच वाढत होतं. कुठंतरी झाडाच्या बुंध्याआड, जांभळीच्या झुडपात लपलेली वाघीण रागानं गुरगुरत क्षणार्धात अंगावर येणार, असंच वाटत होतं. वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती. आता जणू सगळा काळच थांबला असावा, असं वाटत होतं.

''ऑऽ व्हऽऽ'' अचानक नाल्याच्या पलीकडून आलेल्या या बारीक आवाजानं मी जागीच थबकलो. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. एक वर्षाच्या वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की हा वाघिणीचा आवाज आहे. ती या आवाजानं आपल्या पिल्लांना बोलवत असावी. अचानक पाण्यात 'धपकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. मी पाणवठ्याकडं पाहिलं आणि आश्चर्यानं थक्कच झालो. एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती. लगेच त्याच्या पाठोपाठ उरलेली तीनही पिल्लं धपाधप पाण्यात उतरली. आईचा आश्वासक आवाज त्यांच्याकरता उत्साहाचं वारं भरणारा ठरला होता.

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ, बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच. त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो. त्यामुळं वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूमधून मला वाघीण येताना दिसली. ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली. रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होतं. त्यांतील एका पिल्लानं तर वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं-घेणं नव्हतं. त्यांचा आईच्याभोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

साधारणत: कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽवऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लापर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वत:चं पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती-कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती.

वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं. दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना अद्याप भान नव्हतं. ती पाण्यातच एकमेकांशी

खेळण्यात दंग झाली होती. वाघिणीनं परत त्यांना बोलावणारा आवाज काढला. आईच्या या आवाजाबरोबर दोन्ही पिल्लांनी आपला खेळ थांबवला आणि पळत सुटली. दोनच मिनिटांत पिल्लांना घेऊन वाघीण जंगलात दिसेनाशी झाली. आज मी वाघिणीतल्या आईची एक वेगळीच झलक बघितली होती. माझ्या व्याघ्रअनुभवात मोलाची भर घालणारा हा अनुभव होता.

(साप्ताहिक सकाळ, दिवाळी अंक २०१६)

**शब्दार्थ :**

**आश्वासक** – खात्री देणारा. **उत्साहाला उधाण येणे** – खूप आनंद होणे. **दंगाधोपा** – दंगामस्ती.

## कृती

**(१) लेखकाने बिबळ्याची ताजी पावलं पाहिल्यानंतरच्या कृतींचा घटनाक्रम लिहा.**

(१) जंगलाच्या कोपऱ्यात हालचाल जाणवली.

(२) ____________________

(३) ____________________

(४) तिथं तेंदूच्या झाडाखाली बांबूमध्ये बिबळ्या बसला होता.

(५) ____________________

(६) ____________________

(७) वनरक्षकाचा पाय काटकीवर पडला.

**(२) कारणे लिहा.**

(अ) वाघिणीने मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली, कारण.....

(आ) वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल दक्ष होती, कारण.....

**(३) विशेष्य आणि विशेषण यांच्या जोड्या लावा.**

वाळक्या | जंगल | दाट

खेळकर | कान | पिल्लं

दडपण | तिखट | काटक्या

अनामिक

**(४) स्वमत.**

(अ) 'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली', हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(आ) वाघीण आणि तिच्या पिल्लांची भेट हा प्रसंग शब्दबद्ध करा.

(इ) डायरी लिहिणे हा छंद प्रत्येकाने जोपासावा, याविषयी तुमचे मत लिहा.

**उपक्रम :**

(१) सुनीताबाई देशपांडे यांचा 'दर्शनमात्रे' हा लेख मिळवून वाचा.

(२) 'एका रानवेड्याची शोधयात्रा' हे कृष्णमेघ कुंटे यांचे पुस्तक मिळवून वाचा.

# १२. रंग मजेचे रंग उदयाचे

**अंजली कुलकर्णी** (१९५८) :


प्रसिद्ध कवयित्री, लेखिका. छात्रप्रबोधन, किशोर, वयम् यांसारख्या विविध नियतकालिकांतून गद्य व पद्य लेखन. 'मी–एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा', 'संबंद्ध', 'बदलत गेलेली सही', 'रात्र', 'दुःख आणि कविता' हे कवितासंग्रह; 'हृदयस्पर्शी', 'संभ्रमाच्या पाण्यात गटांगळ्या' हे ललित लेखसंग्रह; 'स्त्री स्वत्वाचा शोध', 'स्त्री प्रश्न–एक आवर्त' हे वैचारिक लेखसंग्रह इत्यादी पुस्तके प्रकाशित. दोन काव्यसंग्रहांना राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त. महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, कामगार साहित्य परिषद, गदिमा प्रतिष्ठान यांसारख्या अनेक संस्थांच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जागतिकीकरणाच्या या काळात संगणकयुग अवतरलेले असले तरी माणसाचा मातीशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध तुटता कामा नये. पर्यावरणाची जोपासना केली तर माणसाला कधीच काही कमी पडणार नाही. निसर्गसौंदर्याच्या विलोभनीय आविष्कारात जगण्याचा खराखुरा आनंदही मिळेल असा दृष्टिकोन कवयित्रीने या कवितेत मांडला आहे.

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...

धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे



डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उदयाचे

मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

**शब्दार्थ :**

**सृष्टी** – जग. **पुष्टी** – दुजोरा, पाठबळ. **वृष्टी** – पाऊस. **फेनधवलशा** – फेसाप्रमाणे पांढऱ्या. **अनोखी** – निराळी, वेगळी. **तुष्टी**– तृप्ती.

## कृती

**(१) (अ) कवितेच्या आधारे बी रुजण्याच्या क्रियेचा ओघतक्ता तयार करा.**

डोंगरावर बिया उधळणे

↓

↓

↓

**(आ) आकृती पूर्ण करा.**

काळी आई जगवण्यासाठी अपेक्षित कार्य

**(२) चौकटी पूर्ण करा.**

(अ) जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण

(आ) कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट

**(३) कवितेत आलेल्या खालील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) आभाळाचे छत्र .............

(आ) गर्भरेशमी सळसळ .............

**(४) कृती पूर्ण करा.**

(अ) 'कष्ट करणाऱ्यांना मदत करू' या आशयाची ओळ शोधा.

(आ) 'दौलत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(इ) कवितेतील 'यमक' अलंकार साधणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा.

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गर्भरेशमी सळसळण्याच्या जगात सांगू गोष्टी'

(आ) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय काय करावे असे कवयित्रीला वाटते.

(इ) वसुंधरेचे हिरवेपण जपण्यासाठी उपाय सुचवा.

❖ ❖ ❖

9ZEVTM

## ❖ जगणं कॅक्टसचं (स्थूलवाचन)

**वसंत शिरवाडकर :**

प्रसिद्ध लेखक व साहित्यिक. त्यांचे विविध मासिकांतून वनस्पतींविषयक लेखन प्रसिद्ध आहे.

वाळवंटी प्रदेश म्हणजे प्रचंड उष्णता व कोरडेपणा असणारा तसेच रेताड आणि पाण्याचे दुर्भिक्ष असणारा प्रदेश. वाळवंटी प्रदेशातील 'कॅक्टस' ही काटेरी आणि कमी पाण्यावर जगणारी वनस्पती त्या प्रदेशातील इतर वनस्पतींचे प्रतिनिधित्व करणारी प्रमुख वनस्पती आहे. प्रस्तुत पाठात लेखकाने वाळवंटी प्रदेशात उगवणाऱ्या 'कॅक्टस' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, तिचे उपयोग, कमी पाण्यातही टिकून राहण्याची तिची क्षमता याचे सूक्ष्म वर्णन केले आहे.

वाळवंटी प्रदेश म्हणजे ठणठणीत कोरडेपणा, पाण्याचे दुर्भिक्ष आणि रेताड जमीन. आता या तीन गोष्टी जेथे एकत्र येतात तेथे जीवन कसे फुलणार? पण निसर्ग हा मोठा जादूगार आहे. वाळवंटी प्रदेशातही खास तेथील अशी जीवसृष्टी आहे; वनस्पती आहेत आणि या वनस्पतींवर जगणारे प्राणी आहेत. पाण्याखेरीज वनस्पती व प्राणी जगू शकत नाहीत हे तर खरेच; पण वाळवंटी प्रदेशांना थोडेसे का होईना पाणी मिळते आणि निसर्गाची बहादुरी अशी, की या थोड्याशा पाण्यावर तो तेथे वनस्पती फुलवतो आणि तेथले प्राणी जगवतो. वाळवंटातली जीवनसृष्टी हा खरोखर पृथ्वीवरचा एक चमत्कार आहे.

वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो. कधी तर दोन-दोन, तीन-तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो. अवर्षणाच्या या प्रदीर्घ काळात हा प्रदेश अतिशय वैराण व रुक्ष दिसतो. तेथे जी काय झाडे व झुडपे असतील त्यावर त्या काळात एकही पान असत नाही. जीवन सुकून सुकून निष्प्राण झाल्यासारखे वाटते.

मग एक दिवस पाऊस पडतो आणि एखादी जादू व्हावी त्याप्रमाणे झाडाझुडपांना पालवी फुटते आणि जमिनीत दीर्घकाळ सुप्तावस्थेत पडून राहिलेल्या बियांमधून रोपे वर येतात. पाहता पाहता या रोपांवर भरगच्च फुले फुलतात. इतके दिवस ओसाड पडलेला भूप्रदेश पानाफुलांच्या हिरव्या, पिवळ्या, लाल रंगांनी एखाद्या बगिच्यासारखा चित्रमय दिसू लागतो. कवींनी म्हटल्याप्रमाणे मरुभूमीचे नंदनवन होते; पण हे वैभव पहाटे पडणाऱ्या स्वप्नाप्रमाणे थोडाच काळ टिकणारे असते. लवकरच पुन्हा सूर्य आकाशातून आग ओकू लागतो. हवा तापल्या तव्यासारखी गरम होते आणि पाने, फुले, गवत करपून जाऊन जमिनीत त्यांचा भुगा होऊन पडतो. वाळवंटाचे ओसाड, भकास जीवन पुन्हा सुरू होते. पण एक गोष्ट होते, रोपांना आलेल्या बिया मातीत पडतात, त्या पुढील वर्षाचा पाऊस येईपर्यंत जीव धरून मातीत मिसळून राहतात.

पाऊस आला की उगवायचे आणि पाऊस संपून कोरडा हंगाम आला, की बियांच्या रूपाने मातीत पडून राहायचे हा जो वर वर्णन केलेला वनस्पतीचा प्रकार आहे तो 'अवर्षण टाळणारा' आहे. वाळवंटी प्रदेशात उगवणाऱ्या वनस्पतींचा आणखी एक प्रकार आहे, तो अवर्षणाचा 'प्रतिकार करणारा' आहे. या वनस्पती पाऊस पडतो तेव्हा जे काय पाणी मिळवता येईल तेवढे स्वत:मध्ये साठवून ठेवतात आणि कोरड्या हंगामात अगदी मंद गतीने वाढत राहतात. अवर्षणाचा प्रतिकार करणाऱ्या या वनस्पतींमध्ये सर्वांत महत्त्वाचं कॅक्टस. कॅक्टसची तुम्हांला ओळख करून द्यायला नको. कॅक्टस आता आपल्या दिवाणखान्यात येऊन पोहोचला आहे. कॅक्टस बागेत तर लावतातच; पण मनीप्लँटप्रमाणे कॅक्टसच्या शोभेच्या कुंड्या अनेक घरांतून दिसतात.



अगदी थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना दाखवण्यासाठी निसर्गाने जणू काय कॅक्टसची पैदास केली आहे. वाळवंटी प्रदेशाचा कॅक्टस हा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जाती आहेत. सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा राजा. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. म्हणजे कॅक्टस राक्षसच तो! त्याची वाढ इतकी मंद असते, की ५०

वर्षांत तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्षे जगतो. म्हणजे आज उभे असलेले काही सग्वारो कॅक्टस दुसरे बाजीराव पेशवे यांच्या काळापासूनचे आहेत. तसेच सग्वारोची पन्नास वर्षांत तीन फूट वाढ होते या हिशेबाने एक माणूस त्याच्या सबंध आयुष्यात सग्वारो कॅक्टस फार फार तर त्यांच्या कमरेच्या थोडासा वरपर्यंत वाढलेला पाहील. सग्वारो कॅक्टस हा असा राक्षस, तर काही कॅक्टस तुमच्या हाताच्या अंगठ्याच्या पेऱ्याइतके चिमुकले.

कॅक्टसच्या झाडांनी अवर्षणाचा प्रतिकार करण्याची निरनिराळी तंत्रे पैदा केलेली आहेत. त्याची सगळी अंगरचना पाणी साठवण्यासाठी असते म्हटले तरी चालेल. काही कॅक्टस चेंडूच्या आकाराचे तर काही खांबाच्या आकाराचे. आपल्या अंगाचा कमीत कमी भाग कोरड्या हवेला उघडा पडू द्यायचा, अशी कॅक्टसची धडपड असते. बहुतेक कॅक्टस घडीदार असतात. या घड्यांनी दोन गोष्टी साधतात. एक अशी, की घड्यांच्या आतला भाग कोरड्या गरम हवेपासून सुरक्षित राहतो. दुसरी अशी, की या घड्यांचा पन्हाळीसारखा उपयोग होतो. जेव्हा केव्हा पाऊस पडतो तेव्हा पावसाचे पाणी या पन्हाळ्यांमधून खाली वाहत जाऊन थेट मुळांना मिळते. झाडांतले बरेचसे पाणी त्यांची पाने बाष्पीभवनाने गमावतात, म्हणून कॅक्टसच्या झाडाचे पान ही गोष्ट वर्ज्यच करून टाकली आहे. कॅक्टसचे रोप लहान असते तेव्हा त्याला दोन-चार छोटी छोटी पाने येतात तेवढीच. नंतर कॅक्टसचे झाड बिनपानाचे राहते. कॅक्टसच्या झाडात रसदार गर असतो, त्यावर प्राण्यांच्या धाडी पडण्याचा मोठाच धोका; पण कॅक्टसच्या झाडाने याचाही बंदोबस्त केला आहे. अनेक कॅक्टस झाडांच्या अंगावर धारदार बोचरे काटे पसरलेले असतात. काय बिशाद आहे मग प्राण्याची त्याला तोंड लावण्याची?

कॅक्टसची ही सारी धडपड मिळेल तेवढे पाणी स्वत:मध्ये साठवून ठेवण्याकरता असते. हे पाणी त्यांना अर्थातच त्यांच्या मुळ्यांमधून मिळते. थोड्या वेळात पुष्कळ पाणी शोषून घेता येईल अशी या मुळांची खास रचना असते. पाऊस पडतो तेव्हा सुद्‌धा उन्हाने भाजून निघालेली वाळवंटाची जमीन फारच थोडे पाणी शोषून घेऊ शकते. या अडचणीवरही कॅक्टसच्या झाडाने मात केली आहे. कॅक्टस आपली मुळे लांब लांब पसरवते आणि भोवतालच्या जास्तीत जास्त क्षेत्रातले पाणी शोषून घेते. सग्वारो कॅक्टसच्या मुळ्या यामुळेच ५० फुटांपर्यंत लांब असतात.

कॅक्टस हे अमेरिका खंडातले झाड आहे. झाडासंबंधी आपल्या ज्या कल्पना असतात त्यांचा कॅक्टसमध्ये संपूर्ण अभाव असतो. झाड म्हटले म्हणजे बुंधा, बुंध्याच्या वर चौफेर फांद्या, फांद्यांना डहाळ्या, डहाळ्यांना पाने असे झाडाचे डेरेदार रूप आपल्या दृष्टीसमोर असते. कॅक्टसमध्ये असे काही नाही. कॅक्टस म्हणजे वरच्या बाजूला निमुळता होत गेलेला एक सरळसोट खांब. कॅक्टसला फांद्या असतात; पण त्यासुद्‌धा या सरळसोट खांबासारख्या. सग्वारो कॅक्टस हा तर हात वर करून उभ्या राहिलेल्या एखाद्या मोठ्या बाहुल्यासारखा दिसतो. कॅक्टसच्या सुमारे १००० जाती आहेत. त्यांतील अनेकांचे आकार मोठे चित्रविचित्र आहेत. एका कॅक्टसचे नाव आहे 'सायाळ' कॅक्टस, कारण तो कुंपणाच्या आश्रयाने राहणाऱ्या सायाळासारखा दिसतो. दुसरा एक कॅक्टस अस्वलासारखा दिसतो, म्हणून त्याला 'अस्वल' कॅक्टस असे म्हणतात. एक कॅक्टस थेट पिंपासारखा दिसतो म्हणून त्याला 'पिंप' कॅक्टस म्हणतात. सांबराच्या शिंगासारख्या दिसणाऱ्या कॅक्टसला 'सांबरशिंग' कॅक्टस म्हणतात. कॅक्टसला सर्वसाधारणपणे पाने येत नसली, तरी काही काही कॅक्टसना सुंदर फुले व रसदार फळे येतात. सग्वारो कॅक्टसला शेंड्यावर येणारी फुले पुष्कळशी फुलासारखी गेंदेदार असतात. ही फुले फुलली, की थोडा काळ का होईना बिचाऱ्या ओसाड वाळवंटाला सौंदर्याचा स्पर्श होतो.

अमेरिकेतले रेड इंडियन लोक पूर्वीच्या काळी सग्वारो कॅक्टसचा अनेक प्रकारे उपयोग करून घेत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. सग्वारो कॅक्टसला फळे येतात, त्यामधला गर कलिंगडाच्या गरासारखा असतो. रेड इंडियन लोक ही फळे चवीने खात असत. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो. रेड इंडियन लोकांचे हेही एक खाद्य असते. वर 'पिंप' कॅक्टसचा उल्लेख केला आहे, त्याचा उपयोग वाळवंटातून प्रवास करणारे लोक तहान भागवण्यासाठी करत असत. मात्र त्याचे पाणी काढणे फार जिकिरीचे काम आहे. या कॅक्टसला फार काटे असतात, ते आधी तोडून काढावे लागतात. नंतर कॅक्टसचे घट्ट साल सोलून त्याचा गर काढायचा आणि तो वेचून त्याचे पाणी काढायचे. पाणी मिळणार ते अर्धा किंवा पाव वाटी आणि त्याची चवसुद्‌धा अतिशय तुरट. तहानेने व्याकूळ झालेला प्रवासी अगदी निरुपाय झाला तरच हा खटाटोप करी. 'सायाळ'

कॅक्टसची फळे मात्र स्ट्रॉबेरीसारखी चवीला मधुर असतात. वाळवंटी प्रदेशात बहुतेक झाडांना काटे असतात त्याला खास कारण आहे. ओल्या प्रदेशातही काटेरी झाडे जनावरांनी ओरबाडून खाऊन टाकली तरी पाण्याची पंचाईत नसल्याने ती पुन्हा लवकर उगवून येतात. वाळवंटी प्रदेशात हे शक्य नाही. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे झाड एकदा गेले की गेले. यासाठी या प्रदेशातल्या झाडांनी काट्याची शस्त्रे परजून स्वसंरक्षणाची खबरदारी घेतली आहे.

(किशोर, जानेवारी १९८३)

**शब्दार्थ :**

**दुर्भिक्ष** – अभाव, कमतरता, दुष्काळ. **मरुभूमी** – वाळवंट.

## कृती

(१) 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.

(२) 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' या विधानाची यथार्थता लिहा.

(३) टिपा लिहा.

सग्वारो कॅक्टस

सग्वारो कॅक्टसचे दिसणे

सग्वारो कॅक्टसचे उपयोग

(४) वाळवंटी प्रदेशातील झाडांना काटे असण्याची कोणकोणती कारणे असावीत, असे तुम्हांला वाटते ते लिहा.

(५) 'पाणी हेच जीवन!' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

❖ ❖ ❖

# १३. हिरवंगार झाडासारखं


भाग ४

**जॉर्ज लोपीस** (१९५०-२००५) :

अत्यंत संवेदनशील कवी. सत्यकथा या अंकातून त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. 'रक्तात भिनलेल्या कविता', 'पूर्ण झाले आहे' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

झाडांची सहनशीलता, दातृत्व, सहकार्याची वृत्ती, कठीण प्रसंगांतही घट्ट पाय रोवून राहण्याची वृत्ती इत्यादींचे वर्णन प्रस्तुत कवितेत केलेले आहे. आनंदी जीवन जगण्यासाठी हे सर्व गुण आपल्या अंगी बाणवावेत, झाडांसारखे हिरवेगार ताजे, प्रफुल्लित राहावे, असा संदेश प्रस्तुत कवितेत दिला आहे.

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!



(पूर्ण झाले आहे)

**शब्दार्थ :**

**मौन व्रत** – न बोलण्याचा नियम. **मुकाट** – शांत. **कवेत घेणे** – मिठीत घेणे.

## कृती

**(१) चौकटी पूर्ण करा.**

(अ) कवीने झाडाला दिलेली उपमा–

(आ) पानझडीनंतरचे, नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे–

(इ) कवीच्या मते उत्साही आयुष्य म्हणजे–

(ई) अलगद उतरणारे थेंब–

(उ) फुटते शरीरभर पालवी याचा अर्थ–

**(२) आकृती पूर्ण करा.**

झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी

**(३) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) झाडाच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं असतं?

(आ) झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते?

**(४) 'पानझडीनंतर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**(५) खालील ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(अ) हसावं कसं सळसळत्या पानासारखं.

(आ) जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं.

**(६) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब'

(आ) 'झाडाचे मानवी जीवनातील स्थान', याविषयी तुमचे विचार लिहा.

(इ) 'झाडापासून आनंदी जगणे शिकावे', या विधानातील विचार स्पष्ट करा.

❖ ❖ ❖

9ZNRVA

# १४. बीज पेरले गेले

**चंदू बोर्डे** (जन्म १९३४) :

चंद्रकांत बोर्डे हे भारतीय क्रिकेट संघातील जागतिक कीर्तीचे खेळाडू आहेत. निवृत्तीनंतर त्यांनी क्रिकेट प्रशासकाचे काम केले. राष्ट्रीय निवड समितीचे ते अध्यक्ष होते. क्रिकेटमधील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना अर्जुन पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार तसेच सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कार यांसारख्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

प्रस्तुत पाठात चंदू बोर्डे यांनी आपल्या बालपणातील काही आठवणी सांगितल्या असून आपल्या मनात क्रिकेटचे बीज कसे पेरले गेले हे सांगितले आहे. त्यातून त्या काळाचे हुबेहूब चित्र आपल्या डोळ्यांसमोर रेखाटण्यात चंदू बोर्डे हे यशस्वी झालेले आहेत.

माझ्या बालमित्रांनो, मी तुमच्याएवढा होतो तेव्हा अगदी तुमच्यासारखाच खेळकर, खोडकर व उपद्‌व्यापी होतो! माझा जन्म पुण्यातच एका गरीब कुटुंबात झाला. माझे वडील त्या वेळेस पोलीसखात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. तेव्हा साहजिकच गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो. अशा परिस्थितीत वडिलांना आम्हां मुलांसाठी खेळणी विकत घेणे शक्यच नव्हते. दुसऱ्या मुलांच्या हातात खेळणी पाहून आम्हांला त्यांचा हेवा वाटत असे. तरी पण गल्लीतील मुलांना जमा करून उन्हातान्हात विटीदांडू खेळणे, पतंग उडवणे, कधीमधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे; कैऱ्या, पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे, घरात जळणासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करणे व कुठून तरी जुना पुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे असा माझा दिवसभराचा कार्यक्रम असायचा. संध्याकाळी घरी येईपर्यंत माझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या. दिवसभराच्या खेळाने भूक तर खूपच लागलेली असायची. घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. मग मी घरात एका कोपऱ्यात जाऊन रडत बसायचा! तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

नंतर माझ्या वडिलांची बदली वडगावला झाली. त्याचा परिणाम असा झाला, की मला व माझ्या थोरल्या भावाला शाळेसाठी पुण्यातच काकांकडे राहावे लागले. त्या वेळेस मी अवघा नऊ-दहा वर्षांचा असेन. त्या लहान वयात आई-वडिलांपासून दूर राहणे माझ्या जिवावर येई. खूप रडायला यायचे; पण त्याचा काही उपयोग व्हायचा नाही. हट्टही करून बघितला, पण व्यर्थ. आम्हांला सोडून जाणे आई-वडिलांच्याही जिवावर आले होते; परंतु मुलाने चांगले शिकावे, मोठा ऑफिसर व्हावे व घराण्याचे नाव उज्ज्वल करावे या उद्देशाने त्यांनी कसेबसे मन घट्ट करून आमचा निरोप घेतला.

त्यानंतर माझ्या आयुष्याला एक निराळेच वळण लागले. माझे चुलते पुण्याच्या वाय. एम. सी. ए. च्या कंपाऊंडमध्ये राहत असत. ही संस्था खेळाकरिता प्रसिद्ध असल्याकारणाने बरेच लोक या संस्थेचे सभासद होते. रोज सकाळ-संध्याकाळ ज्यांना जसे जमेल त्याप्रमाणे ते खेळायला येत असत. साहजिकच याचा परिणाम माझ्या बालमनावर होई. मुळातच खेळाची आवड जास्त असल्याने मी त्या सभासदांचा खेळ लक्ष देऊन पाहू लागलो. अनेक खेळाडू पाहण्याची मला रोज संधी मिळू लागली. शाळा सुटली ना सुटली तोच धावत येऊन मी प्रथम ग्राऊंडवर हजर होत असे. सर्व खेळांत मला क्रिकेटचा खेळ फार आवडू लागला. या खेळानेच मला जास्त भुरळ पाडली. कधी कधी, काही खेळाडू स्वत:ला भरपूर खेळायला मिळावे म्हणून लवकर येत असत. कोणी नाही असे पाहून ते मला चेंडू फेकायला बोलवत. मी अशा कामासाठी नेहमीच तयार असायचा. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन! या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मी अधिक उत्साहाने आणि आनंदाने जितक्या जोरात बॉल टाकता येईल, तितक्या जोरात तो टाकून सभासदांची दांडी उडवण्याचा प्रयत्न करत असे. माझा उत्साह पाहून मला उत्तेजन मिळावे आणि त्यांनाही खेळायला मिळावे, म्हणून ते देखील मुद्दाम आऊट होत, तेव्हा माझी छाती आनंदाने फुगत असे आणि मी अधिक जोराने चेंडू फेकत असे. मात्र जेव्हा इतर सभासद येत तेव्हा नाइलाजाने त्यांना बॉल द्यावा लागे. तरीसुद्धा लांब उडालेला चेंडू धावत जाऊन अडवण्यात आणि तो लगेच उचलून फेकण्यात मी समाधान मानत असे. आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे, अशी इच्छा मनात येई.

पुढच्या आयुष्यात क्रिकेट खेळाडू होण्याची खूणगाठ मी इथेच मनाशी बांधली. प्रॅक्टिस संपल्यावर चेंडू गोळा करू लागणे, दुसऱ्या दिवसासाठी ग्राऊंडवर पाणी मारणे इत्यादी कामांत मी ग्राऊंड्समनला आनंदाने मदत करत असे. हे सर्व होत असता, रात्रीचे ६ ते ८ वाजता माझे काका सर्व मुलांना एकत्र बसवून प्रार्थना शिकवत व अभ्यासाला बसवत.

त्यानंतर एक आनंदाची गोष्ट घडली. माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई-वडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आनंद वाटे. माझे वडील स्वत: व्हॉलीबॉल चॅम्पियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रुपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रुपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा मात्र कधीच चुकवली नाही.

१९४५ साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. पूना क्लबच्या ग्राऊंडवर त्याची एक मॅच झाली. या सामन्याला अर्थात तिकीट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आलेली होती. त्यामुळे आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते. ही मॅच तर पाहायलाच पाहिजे आणि तीही फुकटात, म्हणून माझी धडपड सुरू झाली. सुदैवाने हा प्रश्न ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या मोठाल्या झाडांनी सोडवला. माझ्या काही मित्रांसहित झाडावर बसून मी दिवसभर मॅच पाहात होतो आणि अजूनही वाटते, की पुन्हा एकदा तसेच झाडावर चढावे आणि तिथूनच मनसोक्त मॅच पाहावी. मी आणि माझे मित्र मॅचचे वर्णन आमच्या बुद्धीप्रमाणे जोरजोरात हातवारे करून इतरांना ऐकवत असू, दिवसाचा खेळ झाल्यावर कोणी झेल कसा घेतला-कसा सोडला, दांडी कशी उडाली, चौकार कसा मारला याची रसभरित चर्चा करतच आम्ही चालत चालत घरी परतत असू. ही मॅच पाहिल्यावर तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. विशेषत: मॅच संपल्यावर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे ते दृश्य काळजात भिडले. काही खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते, तर काही नाकारत होते. हा सर्व सोहळा पाहून मनात आले, की आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्या भोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. बस्, तेव्हापासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली! विशेष म्हणजे वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली. जर चुकूनमाकून शिक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेलेच व मला प्रश्न विचारलाच तर न कळत माझ्या तोंडातून, 'हाऊज दॅट?' असे उत्तर बाहेर पडे! हे उद्‌गार ऐकून वर्गात एकच हशा होई आणि माझी मान लाजेने खाली होई; पण हीच लाजेने खाली घातलेली मान मी जेव्हा थोड्याच दिवसांनी आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या, तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहाण्यासाठी अभिमानाने वर झाली. माझे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि त्याच वेळी प्रथम मला क्रिकेट खेळत असल्याबद्‌दल धन्य-धन्य वाटले.

माझ्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले आणि उगवले ते असे.

(किशोर, दिवाळी अंक, १९७२)

**शब्दार्थ :**

**भुरळ पडणे** – एखादया गोष्टीविषयी आवड निर्माण होणे. **कनात** – तंबू, डेरा, येथे क्रिकेटच्या मैदानाच्या बाजून उभारलेली कापडी भिंत.

## कृती

**(१) कारणे लिहा.**

(अ) लेखकाच्या आई-वडिलांनी मन घट्ट करून मुलांचा निरोप घेतला, कारण....................

(आ) लेखकाला लहानपणी अनेक खेळाडू पाहण्याची संधी मिळाली, कारण....................

(इ) 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन' असे लेखकास वाटले, कारण....................

(ई) दुसऱ्या मुलांच्या हातांत खेळणी पाहून लेखकाला लहानपणी त्यांचा हेवा वाटत असे, कारण.................

**(२) आकृती पूर्ण करा.**

(अ) लेखकाच्या काळजाला भिडलेले दृश्य

(आ) लेखकाचा बालपणीचा दिनक्रम

**(३) ओघतक्ता तयार करा.**

लाजेने मान खाली

↓

______

↓

______

↓

______

↓

अभिमानाने मान वर

**(४) खालील शब्दांसाठी पाठात आलेले समानार्थी शब्द शोधून लिहा.**

(अ) सही (आ) निवास (इ) क्रीडा (ई) प्रशंसा

**(५) खालील वाक्यांत कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(आनंद गगनात न मावणे, हेवा वाटणे, खूणगाठ बांधणे, नाव उज्ज्वल करणे)

(अ) मोठे झाल्यावर रुग्णांची सेवा करण्यासाठी मी नर्स होण्याचे मनाशी निश्चित केले.

(आ) दारात अचानक मामा-मामींना बघून सर्वांना खूप आनंद झाला.

(इ) आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कौस्तुभने बुद्धिबळ खेळात शाळेचे नाव उंचावले.

(ई) मानसीने म्हटलेल्या गाण्याचे सर्वांनी केलेले कौतुक ऐकून मला क्षणभर तिचा मत्सर वाटला.

**(६) स्वमत.**

(अ) लेखकाच्या वडिलांची शिस्त जाणवणारे प्रसंग पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) तुमच्या मते लेखकाच्या मनात क्रिकेटचे बीज कसे रुजले असावे ते लिहा.

(इ) तुमच्या मते लेखकाच्या मनात पेरले गेलेले क्रिकेटचे बीज कसे उगवले ते लिहा.

(ई) प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांसंबंधी माहिती लिहा.

9ZXHHX

**उपक्रम :** तुमच्या मनात रुजलेले बीज ओळखा व ते कसे उगवेल यासंबंधीचे विचार शब्दबद्ध करा.

# १५. खरा नागरिक

**सुहास बारटक्के** (१९५५) :

प्रसिद्ध लेखक, पत्रकार. 'वडापाव', 'कोकणातल्या आडवाटा', 'कोकणातली देवालये', 'कोकण निसर्ग याग', 'साद मयूराची' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. 'किशोर', 'लोकनाट्य', 'भटकंती', 'वसंत' या मासिकांमधून विपुल लेखन. 'उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार' प्राप्त.

प्रस्तुत पाठात लेखकाने शालेय विषय अभ्यासताना ते फक्त अभ्यासायचे नसून त्यातील मूल्ये आचरणात आणायची असतात हे निरंजनच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट केले आहे. निरंजनने दाखवलेले प्रसंगावधान उल्लेखनीय आहे.

निरंजन आज भल्या पहाटेस उठून अभ्यासाला बसला होता. आज शेवटचा, नागरिकशास्त्राचा पेपर. तो झाला, की संपलीच परीक्षा. इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र, तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो. त्यात हे नागरिकशास्त्र जरा अवघडच.

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजंतवानं बनलेलं असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकतं. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असतं. ते नसेल तर पक्ष्यांचं सुमधुर संगीत साथीला असतंच. अशा आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं. त्याची रीतही लक्षात राहते, हा निरंजनचा अनुभव. त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला– 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.'

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.


आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे? लोकसभा म्हणजे काय? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

मावशीचं घर गावाबाहेर डोंगरपायथ्याशी. मध्ये एक नदीही लागायची. पूर्वी ही नदी पाण्यात उतरूनच चालत चालत पार करायला लागायची; परंतु आता कोकण रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. पुलाच्या एका बाजूने लोकांसाठी पायवाटही ठेवली होती. या पुलामुळं आता जाणं-येणं सोपं झालं होतं. निरंजन अभ्यासाची मनातल्या मनात उजळणी करत झपाझप चालला होता. वाटेत त्याला भला मोठा दगड पडलेला दिसला. कुणीतरी कामासाठी घेतला असेल आणि पुन्हा तसाच ठेवून दिला असेल. निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. त्याला लोकांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचा भयंकर राग येई. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याचं काय! असंच त्याचं म्हणणं. निरंजन पुलावर पोहोचला तेव्हा साडेनऊ वाजून गेले असावेत. आता नऊ पन्नासची गाडी येईल. धाड्धाड् आवाज करत दिमाखात पुलावरून जाईल. ही कोकण गाडी किती छान दिसते; पण दिसते न दिसते तोच लगेच बोगद्यात शिरते. काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला? आपणही मोठं झाल्यावर गाडीतून फिरू, या विचाराने तो हुरळून गेला. तोच त्याचं लक्ष डाव्या बाजूस रुळाखाली पडलेल्या भल्या मोठ्या भगदाडाकडे गेलं. हे छिद्र कसलं? रोज नसतं बुवा, असं म्हणत त्यानं जवळ जाऊन पाहिलं तो कुणीतरी काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवल्याचं त्याच्या ध्यानी आलं. निरंजनला आश्चर्यच वाटलं.

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या. एवढं बोलल्यावर स्टेशनमास्तरांनाही त्याच्या बोलण्यात तथ्य वाटू लागलं. उगाच धोका नको म्हणून गाडी थांबवायला सांगून ते पुलाकडे निघाले. निरंजनने नेमकी जागा दाखवली.

फारच भयंकर! कल्पना करता येणार नाही, असा भयंकर अपघात झाला असता. स्टेशनमास्तरांनी लगेचच गाडी दीर्घकाळ थांबवण्याचा आदेश दिला आणि ते या घटनेचा पंचनामा करायला लागले. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सारे अधिकारी तत्काळ त्या ठिकाणी जमा झाले. पहिली खबर देणारा म्हणून निरंजनलाही थांबावं लागलं. एवढा मोठा अपघात त्याच्या चाणाक्षपणामुळे टळला म्हणून त्याचं कौतुकही झालं; परंतु त्या वेळी निरंजन मात्र दूर एका झाडाखाली बसला होता. तो निराश झाला होता. त्याचा नागरिकशास्त्राचा पेपर चुकला होता. तो नापास होणार होता. त्याला गुरुजींकडून मिळणाऱ्या सगळ्या सवलती रद्द होणार होत्या. निरंजनच्या जवळ येऊन वार्ताहरांनी त्याचं नाव विचारलं. फोटोही काढला. निरंजन उदास मनाने घरी परतला.



दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात निरंजनाची स्तुती फोटोसकट छापून आली होती. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं. त्या दिवशी मावशीच्या घराकडे मोठमोठी माणसं आली. खुद्द जिल्हाधिकारी आले. शाळेचे मुख्याध्यापक आणि भडसावळे गुरुजीही आले. निरंजनने धावत पुढे होऊन गुरुजींचे पाय धरले. रडत रडत तो म्हणाला, ''गुरुजी, मी नापास होणार. माझा कालचा नागरिकशास्त्राचा पेपर बुडाला.''

''नाही रे बाळा. तू उत्तम नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास आणि नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झालास. तुझं वर्ष कसं वाया जाईल? हे बघ, शाळेचे सगळे अधिकारी आलेत. खास बाब म्हणून तुझी नागरिकशास्त्राची परीक्षा उद्या घेतली जाणार आहे, जिल्हाधिकाऱ्यांनी तुला सरकारी वसतिगृहात प्रवेश द्यायचं ठरवलंय आणि वर वह्यापुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. आता नको हं तुला वार लावून जेवायला.''

असं म्हणून गुरुजींनी निरंजनला हृदयाशी धरलं, तेव्हा साऱ्यांचेच डोळे पाणावले.

(साद मयूराची)

**शब्दार्थ :**

**पंचनामा** – पंचांनी तयार केलेला वस्तुस्थितीदर्शक अहवाल. **उपद्व्याप करणे** – नको त्या गोष्टी करणे. **आर्जव करणे** – विनंती करणे. **तथ्य असणे** – सत्यता असणे.

## कृती

**(१) आकृती पूर्ण करा.**

(अ) **भडसावळे गुरुजींच्या मते–**
**सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते कारण**

(आ) **खऱ्या नागरिकाची कर्तव्ये**

**(२) खालील घटनांचे परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) निरंजनच्या आईवडिलांचे निधन | |
| (२) निरंजनचा परीक्षेत पहिला नंबर यायचा. | |

**(३) निरंजनची दिनचर्या लिहा.**

**निरंजनची दिनचर्या**

**(४) खालील शब्दांना पाठात आलेले विरुद्धार्थी शब्द शोधून लिहा.**

(१) अप्रामाणिक × [ ] (२) बेसावध × [ ]

(३) हळूहळू × [ ] (४) पास × [ ]

**(५) निरंजनचे खालील गुण दर्शवणारी कृती किंवा विचार व्यक्त करणारी वाक्ये शोधा.**

(अ) स्वप्नाळू –

(आ) तार्किक विचार करणारा –

(इ) संवेदनशील –

**(६) स्वमत.**

(अ) 'निरंजनच खरा नागरिक' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.

(इ) तुम्हांला निरंजनशी मैत्री करायला आवडण्याची वा न आवडण्याची कारणे स्पष्ट करा.

- **खालील तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्यप्रकार | सूचनेनुसार बदल करा. |
|---|---|---|
| (अ) किती सुंदर आहे ताजमहाल! | ............. | विधानार्थी करा. |
| (आ) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. | ............. | उद्गारार्थी करा. |
| (इ) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. | ............. | प्रश्नार्थक करा. |
| (ई) ते काम खूप मोठे आहे. | होकारार्थी | नकारार्थी करा. |
| (उ) प्रवासात भरभरून बोलावे. | ............. | आज्ञार्थी करा. |
| (ऊ) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? | ............. | विधानार्थी करा. |

❖ ❖ ❖

AC31BU

# १६. स्वप्न करू साकार

**किशोर पाठक** (१९५२) :

प्रसिद्ध कवी. 'पालव', 'निरूपण', 'आभाळाचा अनुस्वार' हे कवितासंग्रह; 'पाण्यातला दिवा' हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध. 'रिंग रिंग रिंगण' या लहान मुलांसाठी लिहिलेल्या काव्यसंग्रहास बालकुमार साहित्य संमेलनाचा ग. ह. पाटील पुरस्कार मिळाला आहे.


या कवितेत कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकजुटीचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व या कवितेद्‌वारे कवीने सांगितले आहे.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।



फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्‌योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।



हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।

या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ।।

**शब्दार्थ :**

**ललकारणे** – पुकारणे. **नौबत** – डंका, मोठा नगारा. **विभव** – ऐश्वर्य, भाग्य, संपत्ती.

## कृती

**(१) खालील शब्दसमूहांतील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) श्रमशक्तीचे मंत्र–

(आ) हस्त शुभंकर–

(इ) आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार–

**(२) आकृतिबंध पूर्ण करा.**

(अ) उत्क्रांतीचा ललकार घुमवणारे घटक

(आ) देशाचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी आवश्यक गोष्टी

**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।

(आ) खालील पंक्तींमधून सूचित होणारा अर्थ लिहा.

घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।

(इ) या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) कवितेत व्यक्त झालेला एकात्मतेचा विचार स्पष्ट करा.

❖ ❖ ❖

ACBHDH

## ❖ व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन)

इयत्ता नववीमध्ये आपण विश्वकोशाची ओळख करून घेतली. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात हे आपण अनुभवले. शब्द तयार कसे होतात किंवा कसे तयार झाले असावेत, याची उत्सुकता आपल्या सर्वांच्या मनात असते. शब्दाची व्युत्पत्ती पाहणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने आपल्या मुलीचे नाव 'सई' ठेवले. 'सई' हा शब्द संस्कृतमधील 'सखी' म्हणजे मैत्रीण या शब्दावरून आलेला आहे. हे कळल्यावर त्याला किती आनंद होईल! आपल्या परिचयाच्या शब्दांची व्युत्पत्ती कळल्यावर जो आनंद मिळतो तो विद्यार्थ्यांनाही मिळावा. व्युत्पत्ती कोशाची गरज व महत्त्व कळावे व शब्दांची व्युत्पत्ती अभ्यासण्याची सवय लागावी या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना भाषेच्या प्रवाहात येणाऱ्या अनेक शब्दांच्या उच्चारांचे व अर्थांचे मूळ व्युत्पत्ती कोशाच्या अभ्यासातून उलगडतात. शब्द हा एकच असतो व तो निरनिराळ्या परिस्थितींमध्ये निरनिराळी रूपे धारण करतो व त्या प्रत्येक रूपाला एक किंवा अनेक अर्थ प्राप्त होतात हे विद्यार्थ्यांना समजणे हा या पाठाचा उद्देश आहे.

### खालील संवाद वाचा.



**राधा** : आई, हे काय आहे गं कोपऱ्यात?

**आई** : अगं, ती सतार आहे. ती आजोबांना इनाम म्हणून मिळालीय महाराजांकडून! गावाकडे होती, ती आज आणली आहे.

**राधा** : इनाम...? इनाम म्हणजे काय गं आई?

**आई** : (हसून) अगं, इनाम म्हणजे बक्षीस!

**राधा** : अगं, माझ्या वर्गातील तनया आहे ना... तिचे आडनाव आहे 'इनामदार'.

**आई** : हो...मला माहीत आहे ती.

**राधा** : इनाम म्हणजे बक्षीस. मग इनामदार म्हणजे...आईऽऽ कसा झाला असेल गं हा शब्द तयार?

**आई** : थांब. आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती कोश आहे. आपण पाहूया हं त्यात 'इनाम' शब्द कसा तयार झाला असेल? त्याची व्युत्पत्ती आपल्याला त्यात सापडेल.

> **इनाम** न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस Prize, gift, inam, grant
> [अर. इन्+आम्=वरिष्ठाकडून देणगी]

**आई** : बघितलंस का राधा? हे इथे 'अर.' लिहिले आहे ना! म्हणजे हा अरबी भाषेतला शब्द आहे. आता आपण –दार हा प्रत्यय शोधू.

> **दार** प्र. स्वामित्वदर्शक फारसी प्रत्यय. A termination showing possession

बघ –दार हा फारसी प्रत्यय आहे. स्वामित्वदर्शक म्हणजे एखादी गोष्ट एखाद्याजवळ आहे असे दर्शवणारा प्रत्यय. इथे 'इनामदार' म्हणजे 'ज्याच्याजवळ इनाम आहे तो' असा अर्थ होतो आणि दार म्हणजे एखादी गोष्ट धारण करणारा असा पण अर्थ घेता येईल. 'जबाबदार' हा शब्द तुला माहीत आहे ना! जो जबाबदारी धारण करतो किंवा घेतो, ज्याच्याकडे जबाबदारी असते तो जबाबदार. तसंच 'इनामदार' म्हणजे ज्याच्याजवळ इनाम आहे किंवा ज्याने इनाम धारण केलेले आहे म्हणजेच ज्याला इनाम मिळालेले आहे असा माणूस.

**राधा** : आई, ही माहिती किती छान आहे! आता मी नेहमी असे शब्द शोधत जाईन.

व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे म्हणजे व्युत्पत्ती सांगणे. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश.

भाषेत अनेक कारणांनी बदल होत जातात. व्युत्पत्ती कोशात या बदलाचे मूळ आपल्याला शोधता येते.

उदा., भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने जे फरक होतात ते भिन्न भिन्न काळांतील भाषा बोलणाऱ्यांच्या शब्दांच्या उच्चारांचे व समाजामध्ये वापरात असलेल्या शब्दांच्या होणाऱ्या अर्थोचित बदलांचे परिणाम आहेत. व्युत्पत्ती कोश या बदलाचे स्वरूप स्पष्ट करतो.

उदा., मराठीतील 'आग' हा शब्द 'संस्कृत'मधील 'अग्नि' पासून आला, हे आपल्याला व्युत्पत्ती कोशामुळे कळते. भाषेत बदल होण्यामागे बऱ्याचदा सुलभीकरणाची म्हणजे सोपे करण्याची प्रवृत्ती असते.

उदा., 'अग्नि' पासून 'आग' हा शब्द तयार होण्यापूर्वी प्राकृतमध्ये 'अग्गि' हा शब्द तयार झाला. हा उच्चार सोपा होत होत मराठी, हिंदी यांसारख्या आधुनिक भाषांत त्यापासून 'आग' हा शब्द तयार झाला. कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते (कधी कधी व्याकरणिक घटकांचीही देवघेव होते.) या सर्वांची नोंद व्युत्पत्ती कोशामध्ये पाहायला सापडते. शब्दसिद्धीमध्ये आपण हे पाहतोच.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | तोंड |
| कन्नड | तुप्प | तूप |
| अरबी | इत्र | अत्तर |

काळाप्रमाणे शब्दांच्या स्वरूपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्परसंबंधात बदल होतात आणि हे बदल अपरिहार्य असतात. निरीक्षण करा, तुमचे आजी-आजोबा बोलत असलेली भाषा, तुमचे आई-बाबा बोलत असलेली भाषा, तुम्ही आणि तुमच्या भावंडांची भाषा, तुम्ही आणि तुमच्या मित्रांमधील भाषा. (उदा., व्हॉटस्ॲपची भाषा) या सगळ्यांत खूप फरक आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल. कधी कधी पूर्वी अस्तित्वात असलेल्या एखाद्या शब्दाचा अर्थ हळूहळू बदलत जातो किंवा मूळ अर्थाबरोबरच आणखी एखादा अर्थ भाषेमध्ये स्थिरावत जातो. उदा., 'शहाणा' या शब्दाचा अर्थ पूर्वी हुशार, बुद्धिमान, चलाख असा होता. हा शब्द सज्ञान या शब्दावरून आला असावा असे व्युत्पत्ती कोशावरून दिसते. आता मूळ अर्थाव्यतिरिक्त 'शहाणा'चा 'अतिशहाणा' असा अर्थसुद्धा रूढ होत आहे. काही काळाने याची नोंद व्युत्पत्ती कोशात दिसण्याची शक्यता आहे.

एकाच अर्थाचे शब्द निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळी रूपे धारण करतात. उदा.,


| शब्द अनेक | अर्थ एक | वेगवेगळ्या संदर्भात वापर |
|---|---|---|
| वात, पवन, मरुत, समीर, अनिल | वारा | पवनचक्की ✓<br>वातचक्की ✕ अनिलचक्की ✕ |
| | | वातचक्र ✓ समीरचक्र ✕ |

तसेच समान दिसणाऱ्या शब्दाचे अर्थ वेगवेगळे असतात.

| शब्द एक | वेगवेगळे अर्थ |
|---|---|
| (१) पाठ | (१) माझी 'पाठ' दुखते आहे. पाठ - शरीराचा अवयव<br>(२) हा 'पाठ' सोपा आहे. पाठ-पुस्तकातील धडा |

## व्युत्पत्ती कोश कसा पाहावा?

आपल्याला एखाद्या शब्दाबद्दल कुतूहल निर्माण झाले, तर आपण व्युत्पत्ती कोश पहातो. उदा., 'दिवाळी' हा शब्द कुठून आला असेल?



**दिवाळी** स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यांसंबंधी)
A row of lights (hence) a Hindu Festival with nocturnal illuminations.
[सं. दीपावलि, दीपालि; प्रा. दिवाली, दीवावली, बं. दिउयाली; ओ. दिआली; हिं/पं. दिवाली, सिं. डिआरी, गु. दिवाळी]

'दिवाळी' हा शब्द आपण पाहिला. मूळ संस्कृत शब्द 'दीपावलि'पासून तो आला आहे. (संस्कृत शब्द 'दीपावलि'चा 'लि' ऱ्हस्व असला तरी मराठीत तो दीर्घ लिहितात. या शब्दांतील 'दी' व 'ली' दोन्ही दीर्घ आहेत; पण 'दिवाळी' हा शब्द मराठी आहे. त्यात 'दि' हा ऱ्हस्व येतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.) विश्वकोशातील या शब्दाची नोंद पाहिल्यावर कंसातील मजकूर पाहताना हे नक्की काय आहे असे तुम्हांला वाटले असेल; पण ही शब्दांची लघुरूपे आहेत हे कळल्यावर आणि त्यांची मूळ रूपे समजल्यावर तुम्हांला ते सोपे वाटेल आणि आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांच्या अंगणातही बागडतो आहे हे कळल्यावर मजाही वाटेल.

व्युत्पत्ती कोशात अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे, हेही दाखवलेले असते. वरच्या उदाहरणात शब्दांची लघुरूपे आलेली आहेत ती जाणून घेणे आवश्यक आहे. शब्दात सुरुवातीला शब्दाची जात लिहिलेली असते. नामाच्या बाबतीत मात्र पुं.-पुल्लिंगी, स्त्री.- स्त्रीलिंगी, न/नपुं.-नपुंसकलिंगी असे लिहिलेले असते. 'दिवाळी' हा स्त्रीलिंगी शब्द असल्याने 'स्त्री.' हे लघुरूप पाहायला मिळते. त्यानंतर वेगवेगळ्या भाषांसाठी लघुरूपे वापरलेली दिसतात. सं-संस्कृत, प्रा-प्राकृत, बं-बंगाली, ओ-ओडिया, हिं-हिंदी, पं-पंजाबी, सिं-सिंधी, गु-गुजराती. या व्यतिरिक्त कोशकार कधी एखाद्या शब्दामागचा इतिहास सांगतात. कधी कधी एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली वेगळी व्युत्पत्ती सांगून ती त्यांना योग्य वाटते की नाही हेही सांगतात.

**व्युत्पत्ती कोशाचे कार्य**

- (१) शब्दाचे मूळ रूप दाखवणे.
- (२) अर्थातील बदल स्पष्ट करणे.
- (३) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.
- (४) बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(यांपैकी पहिल्या दोन बाबींचा अगदी थोडक्यात, सोदाहरण परिचय पाठात आला आहे.

**लक्षात ठेवा.**

(१) १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.
(२) स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते.
(३) 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे', असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला.
(४) कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर या कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली.
(५) बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली.
(६) १९४६ साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले. यानंतरही व्युत्पत्ती कोशाच्या आवृत्त्या निघालेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्या जरूर पाहाव्यात.

**• ताकास तूर लागू न देणे हा वाक्प्रचार कसा आला असावा हे आपण समजून घेऊया.**

शाळेत नाटक बसवले जाणार होते. नाटकात काम करणाऱ्यांमध्ये शरदची निवड झाली होती. मित्र त्याच्याकडून ही बातमी काढून घेण्यासाठी खूप प्रयत्न करत होते; पण शरदने ताकास तूर लागू दिली नाही. अशा प्रकारचे प्रसंग आपल्यावरही अनेकदा येत असतात. आपणही आपल्या मनात काय आहे हे लोकांना अजिबात कळू देत नाही. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना आपण अशी काही उत्तरे देत राहतो, की त्यांना काही कळूच नये. लोकही मग म्हणतात, ''अरे, हा अगदी ताकास तूर लागू देत नाही की!''

आता 'ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ आपल्याला कळला आहेच. कोशातही त्याचा अर्थ ''(एखाद्या गोष्टीचा दुसऱ्यास) बिलकूल थांग लागू न देणे; टाळाटाळी करून स्वत:च्या मनातील विचार दुसऱ्यास न समजू देणे'' अशाच प्रकारचा आहे. पण ताकास तूर लागणे म्हणजे काय? ताक म्हणजे काय? आपण पितो ते ताक? आणि तूर म्हणजे तरी काय? आपल्या मराठी लोकांच्या जेवणात ज्या तुरीच्या डाळीचं वरण असतं ते तूर नावाचं धान्य की काय? ताकाचा अन् तुरीचा संबंध येतो तरी कुठे? येथील शब्द 'ताक' असा नसून 'ताका' असा आहे आणि 'ताका' म्हणजे 'तागा'. 'तागा'चा अर्थ 'मराठी व्युत्पत्ती कोशा'मध्ये कृ. पां. कुलकर्णी यांनी (१) नव्या (अखंड) कापडाचा गठ्ठा; किंवा (२) (विणकराच्या) मागावरली सबंध न फाडलेले (कापडाचे) ठाण असा दिलेला आहे. 'महाराष्ट्र शब्दकोशा'च्या चौथ्या विभागात देखील असा अर्थ दिलेला आहे.

ताका-गा : मागावरील संबंध न फाडलेले कापड; (कापड इत्यादिकांचे) ठाण. (२) दोरा, धागा.

आता 'तूर' या शब्दाचा 'महाराष्ट्र शब्दकोशा'तला अर्थ पाहू. 'तूर' म्हणजे एक प्रकारचं द्विदल धान्य हा अर्थ तर आहेच. पण या शब्दाला दुसराही एक अर्थ आहे. तो असा-

तूर : विणलेले वस्त्र ज्या लाकडाभोवती गुंडाळले जाते ते लाकूड; कोष्ट्याची दांडी

कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या 'मराठी व्युत्पत्ती कोशा'त तूरचा असाच अर्थ दिलेला आहे.

तर 'ताका' (किंवा 'तागा') आणि 'तूर' या शब्दांचे आपल्याला नेहमी माहीत असलेले अर्थ न घेता इथे हे विणकराच्या व्यवसायातले अर्थच ध्यानात घ्यायला हवेत. कारण विणकराच्या मागावरचा ताका किंवा तागा हा वास्तविक 'तुरे'वर म्हणजेच लाकडाभोवती गुंडाळला जायला हवा. पण 'ताका'चा 'तूर' नामक वस्तूशी संबंधच येऊ द्यायचा नाही. ताका व तूर यांचा संबंध टाळायचा. म्हणजे कापड आणि ज्या लाकडाभोवती ते गुंडाळायचे ते लाकूड यांचा संबंध टाळायचा; म्हणजे जे काम खरोखर अपेक्षित असते, व्हायला हवे असते, होणे रास्त असते, तेच मुद्दाम होऊ द्यायचे नाही, असा याचा अर्थ आहे.

**('गंमत शब्दांची' डॉ. द. दि. पुंडे या पुस्तकातून)**

## कृती

**(१) टीप लिहा.**

व्युत्पत्ती कोशाचे कार्य

**(२) खालील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**

व्युत्पत्ती कोश
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- त्याचे प्रकाशन

**(३) पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.**

व्युत्पत्ती कोश

शब्द अनेक, अर्थ एक

उदा., जल, नीर, तोय, ...
– पाणी

शब्द एक, अर्थ अनेक

उदा., पान–
झाडाचे पान (पर्ण),
पुस्तकाचे पान (पृष्ठ)

**उपक्रम :** शिक्षकांच्या मदतीने व्युत्पत्ती कोशातून खालील शब्दांची व्युत्पत्ती शोधून लिहा.

(अ) प्रावीण्य

(आ) चिल्लर

(इ) वीज

(ई) गुपचूप

❖ ❖ ❖

## रसग्रहण

शिशुवर्गात तालासुरांत बडबडगीते म्हणणारा विद्यार्थी जेव्हा मोठा होऊ लागतो तेव्हा लहानपणी गायलेल्या कवितांचा अर्थ त्याला कळू लागतो किंबहुना मोठ्या वर्गात वृत्त, अलंकार शिकल्यानंतर कवितेचं तंत्र कळू लागतं. कविता वाचताना त्याचं मन एका अनामिक आनंदानं भरून जातं. कधी डोळ्यांत पाणी येतं, कधी मन अंतर्मुख होतं, कधी कवितेतील व्यक्तिचित्र, घटना, नैसर्गिक सौंदर्य डोळ्यांसमोर जसंच्या तसं उभं राहतं, तर कधी समाजातील वास्तवाच्या दाहक चित्रणाची जाणीव त्याला होते. या सर्व भावभावनांचा मनात चाललेला व्यापार म्हणजेच कवितेच्या आस्वादाकडे मन वळतं आहे याचं चिन्ह होय.

कृतिपत्रिकेतील पद्यविभागाच्या मूल्यमापनामध्ये कवितेचे रसग्रहण हा घटक समाविष्ट केलेला आहे. कवितेचा आस्वाद घेता येणे, कवितेचे रसग्रहण करता येणे, यादृष्टीने कवितांचा अभ्यास करायचा आहे. कृतिपत्रिकेतील पद्यांशाचे रसग्रहण करा, या घटकासाठी रसग्रहण व काव्यसौंदर्य याचे विवेचन समजून घ्या.

कवितेचे रसग्रहण आशयसौंदर्य, काव्यसौंदर्य आणि भाषिक सौंदर्य (भाषिक वैशिष्ट्ये) या तीन प्रमुख मुद्द्यांना धरून केले जाते. या तीन मुद्द्यांमध्ये अगदी स्पष्ट विभाजन रेषा नसते. ते एकमेकांमध्ये मिसळून गेलेले असतात, म्हणूनच कवितेमध्ये त्यांचा एकत्रितपणे अनुभव येतो. कवितेत अल्प शब्दांतून मोठा आशय व्यक्त झालेला असतो. कवितेत अचूक आणि चपखल शब्दनिवड असते. कल्पनांच्या माध्यमातून, कधी प्रतिमांमधून तर कधी भाषिक वैशिष्ट्यांमधून कवितेचा आशय उलगडायला मदत होत असते, तसेच कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारणही तुम्हांला सांगता यायला हवे. याशिवाय कवितेचे स्वत:चे अंगभूत गुण तुम्हांला माहित असायला हवेत.

(१) काव्यातील शब्द रमणीय अर्थ व्यक्त करतात.

(२) शब्द उत्कट भावनेचा सहज उद्रेक करतात.

(३) शब्दांना आंतरिक लय असते तर कधी रचनाच तालबद्ध असते.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन कवितेचा अभ्यास केल्यास कवितेचा आशय आणि भाषासौंदर्याचा एकत्रित अनुभव घेता येतो. लक्षात ठेवा, की संपूर्ण कवितेऐवजी कवितेतील काही ओळींचे रसग्रहण करायचे असेल, तर तेही त्या मुद्द्यांना धरून करता यायला हवे. प्रत्येक ओळीच्या बाबतीत सगळेच मुद्दे लागू पडतील असे नाही; परंतु त्या ओळींतील आशयाचे काव्यसौंदर्य उलगडता यायला हवे हे महत्त्वाचे असते.

| रसग्रहण | | |
|---|---|---|
| **आशयसौंदर्य** | **काव्यसौंदर्य** | **भाषिक वैशिष्ट्ये** |
| कवितेचा विषय, मध्यवर्ती कल्पना, संदेश, उपदेश, मूल्य, कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव | अर्थालंकार, रस, विविध कल्पना, प्रतिमा, विविध भावना. | कवींची भाषाशैली (ग्रामीण, बोलीभाषा, संवादात्मक भाषा, निवेदनात्मक, चित्रदर्शी) शब्दालंकार, आंतरिक लय, नादमाधुर्य, वृत्त (असल्यास) |

# काव्यसौंदर्य

काव्यसौंदर्याची अभिव्यक्ती म्हणजे कवितेच्या वाचनाने अथवा श्रवणाने मनावर झालेल्या संस्कारांना शब्दात्मक रूप देणे होय. कवींची मूळ संकल्पना, भावना, विचार यांच्या सजावटीसाठी कवीने केलेली विशिष्ट मांडणी, योजलेले शब्दालंकार, अवलंबलेले वृत्त त्याचप्रमाणे कवीने निर्मिलेल्या सृष्टीचे आपल्या मनावर झालेले संस्कार आणि त्यावरून आठवणारी इतर क्षेत्रांतील साम्यस्थळे यांचा एकत्रित परिणाम काव्यसौंदर्यात असतो. कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण समर्पक शब्दांत सकारण कथन करणे म्हणजे काव्यसौंदर्य जाणणे होय.

काव्यसौंदर्यामध्ये विचारसौंदर्य, आशयसौंदर्य आणि भावसौंदर्य अशा वेगवेगळ्या संकल्पनांचा समावेश आहे. कवितेत विचार, आशय आणि भाव या तीन वेगवेगळ्या संकल्पना असल्या तरी त्यांच्यातील विभाजनरेषा तितकीशी स्पष्ट नसते, कारण त्या परस्परांशी एकसंध असतात.

प्रत्येक कवितेच्या काव्यसौंदर्याचा विचार करताना त्यात मांडलेला मध्यवर्ती विचार समजून घेणे महत्त्वाचे असते. उदा., 'औक्षण' या कवितेत राष्ट्राच्या रक्षणार्थ सदैव तत्पर असलेल्या सैनिकाबद्दल सर्वच समाजाने व्यक्त केलेली कृतज्ञता जाणवते. तसेच 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेतून कोणत्याही परिस्थितीत झाडासारखं आतून उमलून यावं, आनंदानं जगता यावं, असा संदेश आपणाला मिळतो.

आता तुमच्या लक्षात येईल, की कवितेचा विषय, आशय, कवितेत मांडलेला विचार, ठसवलेलं मूल्य, दिलेला संदेश आणि कवितेतील भावभावना या सगळ्यांमधून काव्यसौंदर्य प्रकट होत असते, त्यामुळे काव्यसौंदर्याचा अभ्यास करताना प्रत्येक मुद्द्याचा विचार करावा. कवितेत व्यक्त होणारा भाव रसनिर्मितीचा स्रोत असतो. तो समजून कृतिपत्रिकेतील काव्यसौंदर्यांतर्गत येणाऱ्या विचारसौंदर्य, भावसौंदर्य व अर्थसौंदर्य यांवर आधारित कृतींचा अभ्यास खालील मुद्द्यांना धरून करावा.

| काव्यसौंदर्य | | |
|---|---|---|
| **अर्थसौंदर्य** | **विचारसौंदर्य** | **भावसौंदर्य** |
| कवितेचा विषय, कवितेची मध्यवर्ती कल्पना, आशयाला पुढे नेणारा विषय इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा विचार, कधी सर्वसमावेशक, कधी नेहमीपेक्षा वेगळा. अनुभवांचा अंतर्मुख होऊन केलेला विचार इत्यादी. | स्वत:च्या स्वतंत्र भावनांचा आविष्कार, संवेदनशीलता, भावना जागृतीसाठी अंतर्मुख विचार इत्यादी. |

## ♦ उपयोजित लेखन

### १. पत्रलेखन

पत्रलेखन ही कला आहे. आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना/विचारांचे चांगल्या भाषेत संक्रमण करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

तुम्ही मागील वर्षीही 'पत्रलेखन' या घटकाचा अभ्यास केलेला आहे. ते पत्रलेखन तुम्ही पारंपरिक पद्धतीने करत होतात. आता तुम्ही तंत्रज्ञानयुगात वावरत आहात. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांद्वारे तुमची तंत्रज्ञानाशी गट्टीही झाली आहे.

'फोन'चा वापर वाढल्यानंतर पत्रलेखनाची गरज काहीशी कमी झालेली आहे. असे असले तरी अनौपचारिक पत्रात आपल्या भावना शब्दांत प्रभावीपणे व्यक्त करता येणे, हे आवश्यक कौशल्य आहे. तसेच औपचारिक पत्रासाठी आपले म्हणणे, विचार, मागणी, तक्रार, विनंती इत्यादी गोष्टी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, हे आवश्यक कौशल्य आहे. आजही पत्रलेखन ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. यापुढे तंत्रज्ञानाच्या लेखनपद्धतीने आपले लेखन कौशल्य प्रकट व्हायला हवे.

पत्रलेखनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. यापुढील काळात तुम्हांला मेल पाठवण्याचे तंत्र अवगत करावे लागणार आहे. म्हणूनच या वर्षी आपण पत्राचे प्रारूप हे नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार लक्षात घेणार आहोत.

**यावर्षी आपण खालील पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.**

**पत्रलेखन**

- **अनौपचारिक**
  - **कौटुंबिक**
  
    जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
- **औपचारिक**
  - **मागणी, विनंती**
  
    कार्यालयीन व व्यावसायिक पत्र

| औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|
| (१) प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा हुद्दा योग्य तो लिहिणे.<br>(२) पत्राचा विषय लिहिणे.<br>(३) अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे.<br>(४) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे. | (१) व्यक्तीचा उल्लेख योग्य/नात्याप्रमाणे/ सन्मानपूर्वक करणे.<br>(२) व्यक्तीचे क्षेमकुशल विचारणे.<br>(३) भावना प्रभावी शब्दांत मांडणे.<br>(४) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करणे.<br>(५) पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही.<br>(६) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक. |

[टीप – पत्राला उत्तर मिळण्यासाठी पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक ठरते. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आवश्यकता नाही. (ई–मेलसाठी पाकीट नसते.)]

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ———

प्रति, ———

माननीय ——— ,

———

विषय : ———

महोदय,

———

मुख्य मजकूर

आपला/आपली

———

पत्ता

———

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## पत्रलेखन नमुना कृती–१

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

'झाडे लावा... झाडे जगवा'

दिनांक ५ जून

**हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

रोपांचे मोफत वाटप

संपर्क– हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगांव दाभाडे

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

- शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.
- चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

## पत्रलेखन नमुना कृती–२

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

अ आ इ ई

**मराठी सुलेखन वर्ग**

विनय ॲकॅडमी तर्फे

कालावधी १ मे ते ३१ मे

सुलेखन वर्गाचे आयोजन

संपर्क :

श्री. विनय गायकवाड

२, सोमवार पेठ, कराड

माफक फी

भ्रमणध्वनी– ८८४४००१७००

विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.

## २. सारांश लेखन

'आपले म्हणणे थोडक्यात सांगा', हे आजच्या धावपळीच्या युगातले परवलीचे वाक्य आहे. एखाद्या विस्तृत लेखनाला त्याचा संपूर्ण आशय लक्षात येईल अशा पद्धतीने संक्षिप्त रूप देणे हे महत्त्वाचे कौशल्य आहे. हे कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने 'सारांश लेखन' या घटकाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**सारांश लेखनाच्या पायऱ्या :**

(१) दिलेल्या परिच्छेदाचे वाचन.

(२) परिच्छेदातील आशयाचे आकलन होणे.

(३) मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

(४) समजलेला विचार स्वत:च्या शब्दांत थोडक्यात मांडणे.

(**टीप–** कमीत कमी शब्दांत सारांश लिहिणे व त्यातून परिच्छेदातील आशयाचा पूर्ण अर्थ प्रतिबिंबित होणे महत्त्वाचे आहे.)

**कृतिपत्रिकेसाठी–**

(१) सारांश लेखन उतारा १०० ते १२० शब्दांचा असेल. (२) दिलेल्या परिच्छेदाचा थोडक्या (कमीत कमी) शब्दांत सारांश लिहिणे अपेक्षित आहे. (३) परिच्छेदाच्या सारांशातून संपूर्ण आशय लक्षात येणे अपेक्षित आहे. (४) सारांश लेखनाची मध्यवर्ती कल्पना स्वत:च्या शब्दांत मांडणे अपेक्षित आहे. (५) परिच्छेदाचे वा सारांशाचे शब्द मोजून नोंद करणे आवश्यक नाही.

**सारांश लेखन नमुना कृती**

*** खालील उताऱ्याचे सारांश लेखन करा.**

मुकुल डे यांच्यासारखा आज जागतिक कीर्ती मिळवलेला चित्रकार शाळेतल्या गणित, व्याकरण वगैरे विषयांत अजिबात रमत नसे. गुरुदेवांनी त्याच्या हाती रंग, कागद आणि ब्रश दिले आणि सांगितले, ''यात तुला आवड आहे ना, मग चित्रे काढ.'' शांतिदेव घोषांना सुरांचे आणि नृत्याचे प्रेम. त्यांना तंबोरा आणि घुंगरू दिले. निसर्गात वृक्षवल्ली जशा स्वधर्माने वाढतात तसे मानवी जीवन वाढले पाहिजे.नारळाच्या झाडाकडून आंब्याची अपेक्षा केली नाही. भेंडीच्या रोपाला केळी का लटकत नाहीत याची चिंता केली नाही. एकदा रोप कसले आहे हे ओळखल्यावर मग त्याला योग्य ते खतपाणी देऊन ते कसे फुलेल आणि फळ धरील ते मात्र पाहिले. त्याप्रमाणे जोपासले. सगळ्या झाडांना पाणी, ऊन आणि माती हवीच. त्याप्रमाणे किमान आवश्यक शिक्षण देऊन ज्याची जिथे गती त्या क्षेत्रात त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ कशी होईल ते पाहिले. म्हणूनच शांतिनिकेतनात मुलामुलींची भरती प्राथमिक शाळेपासून करण्याचा गुरुदेवांचा आग्रह असे.

***निसर्गातील वृक्षवेली स्वधर्माने वाढतात त्याप्रमाणे विद्यार्थ्याने वाढावे अशी गुरुदेवांची इच्छा असल्यामुळे त्यांनी प्रसिद्ध चित्रकार मुकुल डे यांना चित्रकलेकडे व नृत्य प्रेमी शांतिघोषांना संगीत कलेकडे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. व्यक्तीची आवड व योग्यता ओळखून त्याला योग्य शिक्षण दिले की त्याची मूळ बीजधर्माप्रमाणे वाढ होते.***

# ३. जाहिरात लेखन

आजच्या स्पर्धेच्या युगाचा 'जाहिरात' हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या यशस्वितेवर उत्पादनाच्या विक्रीचा आलेख ठरतो, म्हणून एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सृजनशील कला आहे आणि ती आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे.

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्यातील क्रांतीमुळे जाहिरात क्षेत्राची कक्षा अधिक विस्तारते आहे.

लोकांच्या मनात उत्पादनाबाबत आवड निर्माण करणे, त्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा जाहिरातीचा प्रमुख उद्देश असतो.

- **जाहिरात लेखन करताना खालील महत्त्वाचे मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

(१) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हे उत्तम जाहिरातीचे सूत्र आहे.
(२) जाहिरातीकडे लक्ष वेधले जाईल अशी लक्षवेधी शब्दरचना असावी.
(३) कशाची जाहिरात आहे हे ठळकपणे व आकर्षकपणे नमूद करावे.
(४) आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर करून जाहिरात अधिक आकर्षक करावी.
(५) जाहिराती तयार करताना समर्पक व लक्षवेधी भाषेला महत्त्व असावे.
(६) ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.
(७) जाहिरातीमधील उत्पादनाची गुणवत्ता महत्त्वाची असते, त्यामुळे सवलतीचा उल्लेख असणे आवश्यक नाही.
(८) जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

✻ **कृतिपत्रिकेमध्ये –** (१) जाहिरात पेनने लिहावी, पेन्सिलचा वापर करू नये.
(२) चित्र काढण्याची आवश्यकता नाही.

**जाहिरात लेखनाच्या मूल्यमापन कृती**

- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन करणे.

या व्यतिरिक्त वेगळ्या पद्धतीने, सृजनशीलतेने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील, वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

## जाहिरात लेखन नमुना कृती

**(अ) खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

'आरोग्यम् धनसम्पदा'

**वाळके शक्ती व्यायामशाळा**

**प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा**
**योगासने व व्यायाम हीच आरोग्याची गुरुकिल्ली**

**वेळ**
**सकाळी ५ ते १०**
**सायं ५ ते ९**

**आमची वैशिष्ट्ये**

✻ वातानुकूलित प्रशस्त जागा ✻ सोईस्कर वेळा
✻ आधुनिक सामग्री ✻ तज्ज्ञ प्रशिक्षक

**संपर्क पत्ता –** वाळके शक्ती व्यायामशाळा, 'प्राजक्त' हिल टॉप रोड, अमरावती १४

**कृती सोडवा–**

(१) व्यायामशाळेचे व्यवस्थापक –
(२) व्यायामशाळेच्या ब्रीदवाक्याचा अर्थ –
(३) व्यायामशाळेची वैशिष्ट्ये –
(४) जाहिरातीतून मिळणारा संदेश–

**(आ) दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन**

**आईस्क्रीम पार्लर**

- **वरील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.**

**(इ) शब्दांवरून जाहिरात लेखन :**

**प्रवासी बॅग्ज, मजबूत, सुंदर रंग**
**ग्राहक समाधान**

- **वरील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.**

# ४. बातमी लेखन

आजचे युग हे माहितीचे युग आहे. तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरेच जवळ आले आहे. जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांद्वारे सविस्तर कळते. रोजच्या जीवनातील अगदी **'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील'** यांसारख्या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बातम्यांपासून **'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी'** अशा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या बातम्यांपर्यंत सर्व बातम्या आपल्याला कळतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे, हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.

थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे) हे आज महत्त्वाचे कौशल्य ठरते. बातमी घडून गेलेल्या घटनांची त्याचप्रमाणे घडणाऱ्या नियोजित कार्याचीही होते. ज्यात काय घडले? कधी घडले? कोठे घडले? कसे घडले? कोण-कोण उपस्थित होते? या प्रश्नांची उत्तरे मिळतात, ती म्हणजे बातमी. म्हणजेच बातमी लेखनात जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे.

बातमी लेखनासाठी आवश्यक गुण- (१) लेखन कौशल्य (२) भाषेचे उत्तम ज्ञान (३) व्याकरणाची जाण (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना (५) समग्र वाचन.

कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.

(१) घटनेची विश्वासार्हता.
(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.
(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.
(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.
(५) स्वत:च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

- **बातमी तयार करण्याचे निकष :**

(१) शीर्षक – बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.
(२) दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
(३) घटना घडून गेल्यानंतर बातमी लेखन होत असल्यामुळे बातमी नेहमी भूतकाळातच लिहिली जावी.
(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.
(५) बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाचा मुद्दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमीचे क्षेत्र**

सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय, शालेय/शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन, वैद्यकीय, वैज्ञानिक, दैनंदिन घटना या घटकांच्या संदर्भात घडलेल्या घटनांच्या बातम्या तयार होतात.

- **बातमी तयार करणे – मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.
(२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.
(३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

## बातमीलेखन
### नमुना कृती

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
**शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ.**

आमच्या वार्ताहराकडून | **जनविकास** | दिनांक : २० नोव्हेंबर

### *शहराच्या प्रदूषण पातळीत वाढ*

काल (१९ नोव्हेंबर) दिवाळीतील लक्ष्मीपूजनानंतर शहराच्या प्रदूषण पातळीत ५० टक्क्यांनी वाढ झाल्याची नोंद झाली. आमच्या प्रतिनिधींनी काही जबाबदार नागरिकांची भेट घेतली. नागरिकांनी आपल्या प्रतिक्रियांमध्ये नाराजी व चिंता व्यक्त केली. प्रदूषणामुळे नागरिकांच्या स्वास्थ्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, सण साजरे करण्याबाबत जनतेचे प्रबोधन व्हायलाच हवे, महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याने याची गंभीर दखल घ्यायला हवी, कायद्यातील तरतुदींसंबंधीही विचार व्हायला हवा, अशा प्रतिक्रिया सर्वांनीच आमच्या प्रतिनिधींकडे नोंदवल्या.

- **खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम,
वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न.

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**

रेल्वे प्रवासात प्रवासी नागरिकांजवळ स्वओळखपत्र असणे अनिवार्य. (आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन कार्ड यांपैकी कोणतेही एक.)

# ५. कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशीलतेला वाव देणारा हा विषय आहे.

'कथ्यते इति कथा!' म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. ती पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रूपात मांडली जाऊ शकते. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारांनाही दिशा मिळते. कथाबीजाच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखनकौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे.

- **उत्तम कथालेखनासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

(१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)

(२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.

(३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.

(४) कथा भूतकाळात लिहावी.

(५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.

(६) कथेला भाषेचा, घटनांचा ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.

(७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.

(८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाबीजावरून कथालेखन.

(२) शीर्षकावरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.

(अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.

(ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) मुद्द्यांवरून कथालेखन.

[**टीप–** कथालेखनासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.]

## कथालेखन

### नमुना कृती

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

दिवस कधी मावळला ते कळलेच नाही त्या दिवशी! पाहुण्यांनी घर भरून गेलं होतं. आजीच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. सर्वजण या निमित्ताने एकत्र आलेले पाहून आजी तृप्त झाली होती. एकमेकांशी रक्ताने व मनाने जोडलेल्या तीन पिढ्या एकत्र जमल्या होत्या. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर संध्याकाळी हास्यविनोदात, मनमोकळ्या गप्पांत सारेजण दंग होते आणि अगदी अचानक या गप्पांत एक अनोळखी आवाज ऐकू आला. 'जिजी...मी आलो ग!' खूप वर्षांनी आजीने हा आवाज ऐकला आणि .................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

- **खालील शब्दांना एकत्र गुंफून सुंदर कथा तयार करा.**

मैत्री → दप्तर → गृहपाठ → रस्ता

# ६. लेखन कौशल्य

## निबंध लेखन

स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता, हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंध लेखन या घटकाचा अभ्यास आवश्यक असतो. निबंध लेखन म्हणजे विचारांची विषयानुरूप केलेली मुद्देसूद मांडणी.

यावर्षी आपण प्रसंगलेखन, आत्मकथन आणि कल्पनाप्रधान या निबंध लेखन प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

## निबंध लेखन

### (१) प्रसंगलेखन/अनुभवलेखन–

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र हुबेहूब शब्दांत रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. निरीक्षणशक्ती व लेखनशैलीच्या विकासासाठी अनुभवलेखन/प्रसंगलेखन हा घटक महत्त्वाचा आहे.

**लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) प्रसंग लेखन करताना घटनांचा तार्किक विचार करावा.
(२) भाषा प्रभावी व चित्रदर्शी (हुबेहूब) वर्णन करणारी असावी.
(३) भाषा सोपी असावी. खूप आलंकारिक नसावी.
(४) लेखन प्रसंगानुरूप, संवेदनशील असावे.

**नमुना कृती**

**ज्ञानगंगा माध्यमिक विद्यालय, रत्नागिरी**

**वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम २०१७–१८**

– प्रमुख पाहुणे –
श्री. महेश सकपाळ
– अध्यक्ष –
श्री. संजय देशमुख

दिनांक
२२ डिसेंबर

वेळ
संध्याकाळी ४ वा.

सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

स्थळ – शाळेचे पटांगण

मुख्याध्यापक

- **पारितोषिकप्राप्त मित्राच्या आनंदात सहभागी होण्यासाठी तुम्ही शालेय वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमास उपस्थित राहिला होतात, अशी कल्पना करा व त्या प्रसंगाचे लेखन करा.**

**(२) आत्मकथन–**

**आत्मकथन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार करणे.
(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोग, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.
(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे. (परकाया प्रवेश)
(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.
(५) संपूर्ण लेखन प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत करणे.

**नमुना कृती**

*मी क्रीडांगण बोलत आहे....*

- आनंद
- महत्त्व/गरज
- क्रीडांगणापेक्षा टीव्हीचा प्रभाव
- खंत
- आजची स्थिती
- क्रीडांगणावर अतिक्रमण

**(३) वैचारिक–**

**वैचारिक लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) या निबंध प्रकारात विचारांना प्राधान्य असते.
(२) विचाराला दोन बाजू असू शकतात.
(३) योग्य/अयोग्य दोन्ही बाजूंची साधक–बाधक चर्चा व्हावी.
(४) मुद्द्यांची मांडणी सुसंगत व तार्किक विचारांनुसार असावी.
(५) मुद्द्यांचे समर्थन करण्यास नामवंत विचारवंतांचे विचार, म्हणी, सुवचने यांचा आधार घ्यावा.

(टीप – वाचन, निरीक्षण, चिकित्सक विचार हे वैचारिक मांडणीसाठी आवश्यक आहे.)

**नमुना कृती**

*झाडे लावा झाडे जगवा*

- पर्यावरणाचा ऱ्हास
- झाडांचे उपयोग
- उपाययोजना
- वृक्षतोड–दुष्परिणाम

## हे शब्द असेच लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रसिद्ध | सहानुभूती | वैयक्तिक | जीवनशैली | भाषातज्ज्ञ | अभिव्यक्ती | विश्वकोश | दैनंदिनी |
| वैशिष्ट्य | साहाय्यक | वैश्विक | विपरीत | मुहूर्त | जीवनध्येय | मैत्रीण | निष्क्रिय |
| महत्त्व | शिरोधार्य | संस्कृती | तीर्थरूप | दृष्टी | कनिष्ठ | मैत्रिणीस | पारंपरिक |
| व्यक्तिमत्त्व | निर्णय | सांस्कृतिक | दुष्काळ | दृष्टिकोन | सर्वांगीण | हार्दिक | पुरस्कार |



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) ययाती- वि. स. खांडेकर
(२) बनगरवाडी- व्यंकटेश माडगूळकर
(३) झोंबी- आनंद यादव
(४) ऊन- शंकर पाटील
(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर- शंकरराव खरात
(६) वपूर्झा- व. पु. काळे
(७) कोसला- भालचंद्र नेमाडे
(८) ग्रामगीता- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
(९) गोष्टी माणसांच्या- सुधा मूर्ती
(१०) मराठी व्युत्पत्ति कोश- कृ. पां. कुलकर्णी
(११) कऱ्हेचे पाणी- प्र. के. अत्रे
(१२) मृत्युंजय- शिवाजी सावंत
(१३) फकिरा- अण्णाभाऊ साठे
(१४) वाचू आनंदे भाग १ ते ४- माधुरी पुरंदरे
(१५) लिहावे नेटके भाग १ ते ३- माधुरी पुरंदरे
(१६) सुगम मराठी व्याकरण व लेखन- मो. रा. वाळंबे



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स


https://mr.wikipedia.org/wiki/पु.ल._देशपांडे
https://mr.wikipedia.org/wiki/नारायण_सुर्वे
https://mr.wikipedia.org/wiki/रघुनाथ_अनंत_माशेलकर
https://mr.wikipedia.org/wiki/रवींद्रनाथ_ठाकूर
https://mr.wikipedia.org/wiki/इंदिरा_संत
https://en.wikipedia.org/wiki/Chandu_Borde
https://youtu.be/nSmVnQBHQkY
https://youtu.be/E-E5jd4brXU

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेल्या पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी अक्षरभारती, इयत्ता दहावी (द्‌वितीय भाषा)

₹ ४८.००



मराठी अक्षरभारती, इयत्ता दहावी (द्‌वितीय भाषा)